५

## प्रकरण तिसरे

# 'जंगलाचं देणं' या ललित गद्यसंग्रहाचे वाङ्मयीन सौंदर्य

## प्रकरण तिसरे

# 'जंगलाचं देणं' या ललित गद्यसंग्रहाचे वाङ्‌मयीन सौंदर्य

प्रास्ताविक :

१९८५ साली 'जंगलाचं देणं हा ललितगद्य संग्रह प्रसिद्ध झाला मारुती चितमपल्ली लिखित 'जंगलाचं देणं' या ग्रंथामध्ये वेळोवेळी लेखन केलेल्या सत्तावीस लघुनिबंधाचा समावेश होतो. यातील जवळजवळ सगळेच लेख निसर्ग, पशु, पक्षी, प्राणी, सूक्ष्मजीव, पर्यावरण, आरोग्य आणि जंगलावर आधारीत आहेत. दादा गोरे म्हणतात, "चितमपल्ली यांचे 'जंगलाचं देणं' मधील लेख पक्षी, वृक्ष आणि जंगल यांच्याशी निगडित आहेत. हे सारे लेख चितमपल्ली यांच्या अभ्यासावर–संशोधनावर आणि वास्तवतेच्या प्रचंड अनुभवावर लिहिले गेलेले आहेत."[१] तसे पाहिले तर पुस्तकाच्या मुखपृष्ठावरुनच आतील आशयाची कल्पना येते. कारण या पुस्तकाचे मुखपृष्ठ हे ढगाळलेले आभाळ, त्यातील काळेपांढरे ढग, धरतीवरची हिरवीगार वनराई, झाडे, शेती, खडक, आकाशात विहार करणारे पक्षी, खाली डोंगर भाग आणि टेकडी असे आहे. तर मलपृष्ठावर मुंबई सकाळ, गो. नी. दांडेकर, ग्रेस, शांता शेळके, रविंद्र पिंगे, डॉ सुदेश मिश्र, या ज्येष्ठ साहित्यिक समीक्षकानी या पुस्तकाविषयी आपापली मते मांडली आहेत.

वनाधिकारी म्हणून वनात काम करत असताना चितमपल्लींची आलमेलकराशी ओळख झाली आणि त्यातून अनुभव संचित होऊन लेखकाने हे पुस्तक लिहिले. त्याबद्दल चितमपल्ली लिहितात, "थोर चित्रकार आलमेलकरांचा परिचय झाला. वाटेनं चालता चालता ते अॅरिस्टॉटलप्रमाणे निसर्ग व आदिवासी यांच्याविषयी अद्‌भूत रम्य गोष्टी सांगत. पशुपक्षी आणि आदिवासींची उभ्या उभ्याच सहजसुंदर आणि अप्रतिम रेखाटने काढीत त्यातून संचित अनुभवाला एक विशिष्ट आकार आला. त्या अबोल अबोध अनुभवांना शब्दकळा कधी आणि कशी फुटली हे लक्षात आलं नाही. मला लाभलेलं हेच 'जंगलाचं देण"[२] चितमपल्लीच्या लेखनाचा श्रीगणेशा गो. नी. दांडेकर यांच्या प्रेरणेने झाला. चितमपल्ली म्हणतात, "गो. नी. दांडेकर याच्या मार्गदर्शनाखाली थोडफार लेखन करण्याचा प्रयत्न करू लागलो माझ्या लेखाचा श्रीगणेशाही त्याच्याच प्रेरणेने झाला त्यांच्यामुळेच मला शब्दाच धन गोळा

करण्याचा छंद लागला''[३] चितमपल्लींनी हे जे शब्दांचे धन गोळा केले ते 'जंगलाच देण' पुस्तकामध्ये उदंड हाताने ओतले आहे. प्रत्येक वाचक आता या धनाचा लाभ घेतो आहे. त्यानंतर चितमपल्ली लिहितात, ''जंगलाचं देणं या पुस्तकाला उत्कृष्ठ साहित्य निर्मितीचा राज्य पुरस्कार आणि विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.''[४] खरंच हे पुस्तक उत्कृष्ट आहे. जंगल या एका अनोंळखी विषयाची ओळख लेखकाने येथे करून दिलेली आहे. सजीव असे हिरवेगार निसर्ग चित्रण केलेले आहे. अनेक शब्दांचा साठा देऊन लेखकाने मराठी साहित्याचा मळा फुलवला आहे. तसेच एकाचवेळी सूक्ष्मता आणि भव्यता यांची सांगड घातली आहे. माणसाची नजर कशी एकाचवेळी अतिसूक्ष्म गोष्टीपासून अतिभव्य गोष्टीपर्यंत जाऊ शकते हे या ग्रंथ लेखनाने सिद्ध केलेले आहे. अगदी सहजासहजी आलेले अनुभवसुद्धा किती मोलाचे असतात. याच प्रत्यय या पुस्तकातून येतो. समर्पक अशी भाषा वापरून स्वतःचे नवीन शब्द देऊन लेखकांनी मराठी भाषेला रसाळ बनविले आहे. यावरून इथे गीतेची आठवण होते. कारण गीतेतील सहाव्या अध्यायामध्ये ज्ञानेश्वर म्हणतात,

> ''माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिकें । परि अमृतातेही पैजेसी जिंके ।।
> ऐसी अक्षरे रसिकें। मेळवीन ।।१४।।''[५]

ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेला अमृतातेही पैजा जिंकण्याचे सामर्थ्य प्राप्त करून दिले. त्यांच्यामुळे मराठी भाषेला माधुर्य लाभले तसेच चितमपल्लींनीही आपल्या लेखनाद्वारे मराठीला गोडवा प्रदान केले. 'जंगलाचं देणं' हे पुस्तक वाचताना वाचकाला याचा प्रत्यय येतो.

## या ललित गद्याचा आशय, वर्णन :

कोणत्याही लेखकाच्या लेखन शैलीवरून आपणास त्याच्या लेखनाचा दर्जा समजतो तीच शैली पुढे त्या लेखकाचे अंगभूत वैशिष्ट्य बनून राहते यासाठी प्रथम शैली म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे रा. ग. जाधव यांच्या मते, ''साहित्यकृतीतील आशयाचा आविष्कार कसा झाला आहे हे शैलीवरून समजते.''[६] चितमपल्लींची लेखनशैली खूप सुंदर आहे. त्याचबरोबर त्याच्या व्यक्तिमत्वाचाही आविष्कार त्यांच्या साहित्य लेखनातून

होतो. म. द. हातकणगलेकर म्हणतात, **'Style is the man'** शैली हा लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा आविष्कार होय. **Good style is not the dress but the skin out man** या अर्थाचे, आदर्श शैली ही विषयाच्या त्वचेसारखी अंगभूत असावी.''[७] चितमपल्लींची लेखन शैली ही अशीच आदर्श आहे. निसर्गातील कोवळे अमृतकण चितमपल्लींनी या निबंधांमध्ये टिपलेले आहेत.
डॉ. सुहास पुजारी म्हणतात, ''जंगल दर्शनातून चितमपल्लींनी मराठी साहित्यात आशयाचे एक नवे रान खुले केले.''[८] चितमपल्लींनी जंगल दर्शनातून आलेले अनुभव 'जंगलाच् देणं' या पुस्तकामध्ये व्यक्त केलेले आहेत. याचा प्रत्यय ठायी ठायी आपणास येतो.

## लघुनिबंध

### १. जंगलाचं देणं

'जगलाचं देणं' या पुस्तकातील सत्तावीस लघुनिबंधाच्या आशयाचा विचार या 'जगलाचं देणं' या प्रकरणात केलेला आहे. चितमपल्लींनी 'जंगलाचं देणं' हे सुंदर असं पुस्तक लिहून मराठी साहित्याच्या दालनामध्ये मोलाची भर घातलेली आहे. लालित्यपूर्ण शैलीत लिहिलेल्या या सत्तावीस लघुनिबंधामध्ये काही लघुनिबंध पशु–पक्ष्यांवर आहेत, काही प्राणी जीवनावरचे आहेत. तर काही झाडाझुडुपांवर आधारीत आहेत. यामध्ये जंगलातील काही अद्भूत कथांचाही समावेश केलेला आहे. समीक्षक दादा गोरे म्हणतात, ''जगलाचे देणं या चितमपल्लींच्या ललित संग्रहात एकूण सत्तावीस लेख आहेत. यातील पहिले आठ लेख जंगलातील वैशिष्ट्यपूर्ण वृक्षांवरचे आहेत. उरलेले लेख पशु–पक्षी याच्यावरील आहेत.''[९]

चितमपल्लींनी या निबंधात प्रथम जंगलाच्या निर्मितीची ओळख करून दिली आहे. कारण 'जंगल' म्हटलं की आपल्या मनात येत ही जंगलं कशी निर्माण झाली असतील? तेव्हा लेखक या प्रश्नाची सोडवणूक करतात, ''वाऱ्यावादळानं वृक्षाचं बीज जिकडं–तिकडं विखुरलं. पाण्यानं ते वाहून आलं, तर कुठं पाखरांनी आणून टाकलं, तर कुठं ते वाया गेलं, तर कुठं रुजलं, वाढलं. जनावरापसून वाचलं तेवढं फोफावल त्यांची झाडं झाली.''[१०] दादा गोरे म्हणतात, ''चितमपल्ली यांचे सारे आयुष्यच जंगलानुभवाने समृद्ध झालेले आहे.''[११]

जंगलातील वाटेनं चितमपल्ली एकटेच वृक्ष समूहाकडे पाहात आजूबाजूचे आवाज ऐकत भटकत असतात, यावरून लेखकाची जंगलात भटकण्याची आवड लक्षात येते. लेखकाने वृक्षांकडे पाहून त्यांच्यातील नात्याचा शोध लावला. हे नातं कुठं प्रेमाचं, कुठ दुरावयाचं, कुठं नम्रतेचं, कुठं ताठरपणाचं, कुठं समाधानाचं, तर कुठं साफल्याचं... हळूहळू लेखकाला हे नातं उमगू लागलं. भरती ओहोटीचे पाणी जेव्हा जंगलात शिरते तेव्हा त्याला 'टायडल फॉरेस्ट' म्हणतात. इथे लेखकानं जंगल आणि पाण्याचं साहचर्य दाखवून दिले आहे. शिवाय त्याला जे इंग्रजी नाव आहे त्याचा उल्लेख केला आहे. निबंधात चितमपल्ली म्हणतात, 'वनांच्या सावलीत मी वाढलोय, ग्रंथात आढळून येणार नाही अस ज्ञान मी जंगलातून प्राप्त केलंय.' या अनुभवावरून लेखक सांगतात, "तुम्हाला तुमच्या मुलांना विचारी बनवायचं असेल तर त्यांना जंगलात व पर्वतावर न्या त्यामुळे त्यांच्यात पवित्र भावना जागृत होतील." निसर्ग हा मानवाचा मित्र आहे, गुरु आहे. त्याची विशालता मानवाचे मन विशाल बनविते आशावादी व पवित्र बनविते. हेच चितमपल्लींनी इथे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## २. चिंचा आल्यात पाडाला...

या लघुनिबंधामध्ये चिंचेच्या झाडाचे फक्त वर्णनच नाही तर चिंचेच्या झाडाला इतर भाषेत काय म्हणतात, इथपासून ते झाडाची उपयुक्तता आणि त्याच्या रक्षणासाठी शासनाने घेतलेला निर्णय इथपर्यंत सविस्तर उल्लेख आलेला आहे. 'अरबी भाषेत चिंचेला तमार–उल–हिंद हिंदुस्थानचे खजुरीचे झाड म्हणून संबोधले जाते. यावरून लेखकाने इतर भाषेतील शब्दांचा वापर जाणीवपूर्वक केलेला आहे. याचा प्रत्यय येतो. चिंचेच्या झाडाला दीर्घायुष्य असते. वाऱ्यावादळापासून हे झाड गावाचे रक्षण करते. डेरेदार आकार असल्यामुळे सर्वांना गर्द छाया मिळते. अनेक पक्ष्यांना या झाडावर आश्रय मिळतो. दादा गोरे म्हणतात, "चिंचा आल्यात पाडाला' या लेखात चिंच या वृक्षासंबंधी सपूर्ण माहिती जशी येते तसेच या वृक्षांवर कोणकोणते पक्षी थांबतात, घरटी करतात आणि चिंचेची झाडे भंडारा जिल्ह्यात जास्त आहेत याची माहिती चितमपल्ली देतात."[१२] म्हणून भंडाऱ्यात चिंचेच्या झाडाला कल्पवृक्ष म्हणतात आणि भंडारा जिल्ह्यातील गावं जणू चिंचेच्या राईत वसली आहेत असं वाटते.

'चिंच' या वृक्षाचे अनेक उपयोग आहेत. चिंच स्वयंपाकात वापरतात. रेशीम रंगविण्यासाठी चिंचेच्या पानाचा उपयोग केला जातो. चिंचोके गरीब लोकंचे अन्न आहे. चिंचेचे लाकूड हे टिकाऊ असल्याने उसाचे चरक बनविण्यासाठी लाकडाचा वापर करतात. तसेच मूळव्याध परमा, खोकला, विंचवाचा दंश इ. अनेक रोगांवर वनौषधी म्हणून होतो. त्यामुळे हे झाड म्हणजे औषध देणारा वैद्यच वाटतो. इथे लेखकाने चिंचेच्या झाडाला वैद्याची उपमा दिल्याने रूपक अलंकार आपोआपच आलेला दिसतो चिंचेच्या झाडावर अनेक प्रकारचे पक्षी राहतात. रात्रींचा त्यांचा तो निवाराच आहे. तेव्हा या पक्ष्यांनी आणि झाडांनी गावची समृद्ध द्विगुणित केली आहे. एवढेच नव्हे तर चैतन्य महाप्रभूंना या वृक्षाखलीच बोध प्राप्त झाला. शिवाय चिंचेचा वृक्ष आजही वृंदावनात आहे याची चितमपल्लींनी आठवण करून दिली आहे चिंचेच्या झाडांच्या फांद्या घनदाट असल्याने पक्ष्यांच्या घरट्यांना नैसर्गिक रक्तपोसच' मिळतो म्हणजेच या पक्ष्यांचे शत्रूपासून संरक्षण हाते. चिंचेच्या या सुरक्षित जागेला चितमपल्ली 'चिंचेचा कडेकोट किल्ला' म्हणतात. किल्ल्यात जशी सुरक्षितता लाभते तशीच सुरक्षितता पक्ष्यांना चिंचेवर बांधलेल्या घरट्यात लाभते.

'भुताशी लग्न झाले तर चिंचेच्या झाडावर चढावे लागते.' या तामिळ भाषेतील म्हणीचा संदर्भ लेखनात आलेला आहे. नंतर 'वाघाची डरकाळी नव्हे, तर नुसता हुंकार ऐकूनही बगळे ढोकरी भितात.' हा संदर्भ 'मुगपक्षिशास्त्र' या संस्कृत ग्रंथातील आहे. याची चितमपल्लींनी जाणीव करून दिलेली आहे. असा हा निबंध परिणामकारक आहे. तसाच मनोरंजक आहे. यातून लेखकाची अभ्यासूवृत्ती दिसून येते. शिवाय वाचकालाही अभ्यासपूर्ण माहिती मिळते. वनस्पतींचे औषधी गुणधर्म मानवी जीवनास खूप उपकारक आहेत हे जाणून चितमपल्लींनी अत्यंत सूक्ष्मतेने या लघुनिबंधात चिंच या वृक्षाची उपयुक्तता स्पष्ट केली आहे.

### ३. पळस

या लघुनिबंधामधून असे दिसून येते की, वनातील जमीन निकस व्हायला लागली की, पळसाचं प्रमाण वाढू लागतं. त्यामुळे पळसाला निकृष्ट जमीनींचं प्रतीक समजलं जातं. एरवी पळसाच्या झाडाइतकं अनाकर्षक असं जंगल काहीच नसतं. अगदी शेळ्या–मेंढया, गुरंढोरंसुद्धा या वृक्षाला तोंड लावत नाहीत. चैत्र महिन्यात हाच वृक्ष लाल फुलानी बहरून

आला की, विविध पक्षी, प्राणी, आदिवासी त्या वृक्षाकडे आकर्षित होतात. पळसाचं सौंदर्य, आणि महत्व चितमपल्लींनी प्राचीन, संस्कृत संदर्भ देऊन पटवून दिलेलं आहे.
उदा :— रामायणात प्रभू रामचंद्र सीतेला म्हणतात,

आदीप्तानिव वैदेहि सर्वतः पुष्पितान्न्गान्।

स्वैः पुष्पैः किंशुकान्पश्य मालिन शिशिरात्यये।।पृ. १७।।"

चितमपल्लींनी याचा मराठी अर्थही दिलेला आहे. सीते ! बघ, वसत ऋतूत पळस जणू फुलांच्या माळा ल्याला आहे. यावरून अर्थासह आपले लेखन वाचकांच्या हृदयापर्यंत पोहचविण्याची चितमपल्लींची तळमळ दिसून येते.

खूप वर्षापूर्वी पळसावर लिहिलेल्या एका कथेचा संग्रह लेखकाने या निबंधात घेतलेला एक बौद्ध भिक्षू रोज भिक्षेसाठी गावात जाई एक दिवस एका वेश्येला त्याने भिक्षा मागितली, तेव्हा तिने त्याला मोत्याचा हार प्रदान केला. पण त्याने तो नाकारला आणि म्हणाला. मला पळसाच्या द्रोणात पाणी हवंय. 'बुद्धदेवांच्या चरणावर वाहण्यासाठी' यावरून त्या साधुमध्ये गौतम बुद्धाच्या तत्वाज्ञानाप्रमाणे निरीच्छपणा जाणवतो. तो साधू मोत्याच्या हारापेक्षा पळसाच्या पानाला जास्त महत्व देतो. कारण देव हा फक्त भक्तीचा भुकेला आहे. मनोभावे दिलेले साधे पानफलसुद्धा परमेश्वर आनंदाने स्वीकारतो उदाः— भगवान श्रीकृष्णाने गीतेत सांगितले आहे.

"पत्रं, पुष्पं, फलं, तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ।।२६।। (गी. ९, २६)"[१३]

याप्रमाणे परमेश्वराला भक्तीभावाने सर्वस्व म्हणून ज्यानं, फुलं, फळं व पाणी काहीही अर्पण केलं तरी तो ते आनंदाने स्वीकारतो. हेच जणू लेखकाला येथे या कथेद्वारे सांगायचे आहे. चितमपल्लींच्या चौफेर अभ्यासाची जाणीव होते. या निबंधात गाथा सप्तशतीकारानं तरुणांना सावधगिरीची सूचना दिली आहे. असा उल्लेख येतो. कारण वसत ऋतूचा बहर पाहून या बहरात अनेक तरुणांच्या मनात कामवासना जागृत होतात. त्यामुळे

लोकांना वसंत ऋतूतील बहराची भीती वाटते. असे लेखकाला इथे सांगायचे आहे कांचनमृगाला पळसाची फुले खायला आवडतात याचाही उल्लेख लेखकाने केला आहे.

होळी जवळ आली की, जंगलात राहणाऱ्या आदिवासी स्त्रिया पळसाच्या फुलापासून पिवळाधमक रंग तयार करून वनाधिकाऱ्याची वाट पाहत असायच्या. चितमपल्ली अनेकवेळा या रंगात न्हालेत. आजही वसंत आला की लेखकाला त्या प्रसंगाची आठवण होते आणि लेखकाचे मन बावरून जाते. यावरून असे दिसून येते की, चितमपल्लींनी मनमोकळेपणाने जीवनात जे अनुभव आले ते अगदी सहजपणे मांडले आहेत. चितमपल्लींनी जीवनातील प्रत्येक अनुभवाचा उल्लेख निःसंकोचपणे केलेला आहे. 'पळस' या वृक्षाच्या अनुषंगाने लेखकाने मानवी जीवनाचा सर्वांगाने विचार केला असल्याचा प्रत्यय येतो.

## ४. निंबोणीचं झाड करवंदी...

हे फक्त शीर्षक जरी वाचलं तरी आपण बालपणी ऐकलेल्या 'चांदोबा, चांदोबा भागलास का?' या गीतात रमू जातो. हे गीत सर्वांच्या परिचयाचं आहे. त्यामुळे वाचक हे गीत गुणगुणल्याशिवाय राहणार नाहीत. हे गीत वाचकाला बालपणात घेऊन जातं. लिंबाच्या झाडाचे महत्व पटवू देण्यासाठी चितमपल्लींनी अतिशय सुंदर अशाच गीताचा संदर्भ इथे दिलेला आहे त्यावरून संदर्भाची सूचकता जाणवते.

आपण सर्वजण रोज म्हटल तरी लिंबाचं झाड पाहतो पण त्याचे शास्त्रीय महत्व, औषधी गुणधर्म, त्या वृक्षाचे सौंदर्य या गोष्टींकडे आपण जास्त लक्ष दिलेले नसते. परंतु हे ज्ञान आपल्याला या निबंध वाचनातून मिळते. दिवसा हे झाड फारसं आकर्षक दिसत नाही परंतु रात्री मात्र त्याचं सौंदर्य उठून दिसते. प्राचीन काळातील एक मजेदार कथेचा या निबंधामध्ये संदर्भ आलेला आहे. 'दीर्घकाळ लांबच्या प्रवासाला निघालेल्या पती लवकर घरी लवकर यावा म्हणून पत्नीने वैद्याचा सल्ला घेतला आणि पतीला जाताना चिंचेच्या झाडाखाली झोपायला सांगितले आणि परतीच्या प्रवासात कडूनिंबाच्या झाडाखाली झोपाव असा सल्ला दिला, कारण चिंचेच्या झाडाखाली झोपल्यानं माणसं आजारी पडतात. आणि कडूनिंबाच्या झाडाखाली झोपल्यानं प्रकृती लवकर बरी होते. पतीला लवकर घरी आलेला पाहून पत्नीला आनंद होतो. चितमपल्लींनी स्त्रीच्या मनातील भावनांचा शोध घेतला

आहे. चितमपल्लींच्या लेखनातील सामाजिकता इथे जाणवते.

व्यंकटेश माडगूळकर म्हणतात., 'मोहा , पळस, चिंच, निंबोणी, देवदार या झाडावरचं चितमपल्लींचे लेख वाचले की, त्याचं वृक्षांशी असणारं नात कळतं."[१४] चितमपल्लींनी लालित्यपूर्ण शैलीत लिंबाच्या झाडाच्या पानाफुलांफळांचे वर्णन केले आहे. त्याच्या सेवनाने अनेक व्याधींचे निर्मूलन होते. आपल्याकडेही निंबाची पाने औषधी म्हणून खातात. निंबाचे लाकूड टिकाऊ असल्याने जहाज बांधणीत, वृक्षाच्छादीत मार्ग बनवण्यासाठी त्याचा उपयोग होतो. या झाडाच्या बाबतीत एक चमत्कार घडतो. या झाडाच्या आडव्या फांदीतून एकाएकी ताडीसारखा पांढरा द्रव वाहू लागतो. अस होणं लोक अशुभ मानतात हा एक लोकसमज आहे. चितमपल्लींनी इथे लोकामध्ये असणारी अधश्रद्धा निदर्शनास आणून दिली आहे. सामाजिक जागृतीसाठी हा लघुनिबंध मोलाचा ठरतो. चितमपल्लींच्या लेखनशैलीतच इतका गोडवा आहे की, कडूनिंबाचीसुद्धा वाचकांना गोडी लागते. या निबंधामध्ये चितमपल्लींनी निंबाच्या झाडांचे औषधी गुणधर्म सांगून त्याचे महत्व पटवून दिल्याने हा निबंध,अत्यत परिणामकारक झालेला आहे शिवाय लोककथा, लोकगीते यांच्या संदर्भामुळे हा निबध अभ्यासपूर्ण झाला आहे. शीर्षक उत्कंठावर्धक व साजसे आहे. शैली ओघवती आहे

## ५. मोहा फुलला

प्रस्तुत निबंधात 'मोहा' या वृक्षाच्या बहारदार वर्णनाबरोबर आदिवासीचे जीवनचित्रणही आलेले आहे. लेखकाने आदिवासींचे खाणं पिणं त्यांची लोकगीते. त्यांचे समजगैरसमज इ. सगळं काही उघडपणे सांगून हा लेख आकर्षक बनविला आहे. मोहाचे वृक्ष बहरू लागले की, आदिवासींना वैशाख वणव्याची चाहूल लागते. मोहाची फुल म्हणजे आदिवासींचं अन्न असते. 'मोहाच्या फुलांचा रंग फिकट पिवळा असतो. फुलाच्या देठात मधुर रस असतो.' या वाक्यावरून चितमपल्लींच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा प्रत्यय येतो. झाडाखाली पडलेल्या फुलांचे वर्णन लेखकाने मोहक शब्दात केले आहे.
उदा :– सूर्योदयापूर्वी त्यांचा खमंग तापलेल्या दुधावरच्या सायीसारखा वृक्षाखाली सडा पडतो.' चितमपल्लींच्या लेखनामध्ये शब्दाशब्दात गोडवा आहे, रस आहे. हे दिसून येते

मोहाचे झाड जंगलातील लोकगीतात प्रसिद्ध आहे. तसेच प्रेमामुळे सुंदर वस्तूच्या ठिकाणी प्रियेचं सादृश्य कसं दिसते. याचं एक उत्तम उदाहरण लेखकाने दिले आहे. एक वाटसरू या मधूर पुष्पाचा वास घेतो. त्याला सपर्श करतो ते फुल आपल्या हृदयावर ठेवून रोमांचित होतो कारण त्या मधुकपुष्पाच्या दर्शनाने त्याला आपल्या पत्नीच्या गुबगुबीत गालाची आठवण होते. इथे हा संदर्भ देऊन लेखकाला मोहाच्या फुलाचे सौंदर्य दाखवून द्यायचे आहे. मोहाच्या फुलांवरील हे लेखन वाचकांना मोहून टाकते. शांता शेळके म्हणतात, "चितमपल्ली, मी आपले लेख सतत वाचते 'मोहा फुलला सारखे लेख मी अतिशय आवडीने वाचले आहेत."[१७] चितमपल्लींनी लिहिलेला हा लघुनिबंध खरोख्रच मोहक आहे. चितमपल्ली इथे आदिवासी स्त्रियांच्या मनातील व्यथा व्यक्त करतात. मोहा जेव्हा फुलांनी बहरून येतो तेव्हा आदिवासी स्त्रियांचा आनंद क्षणात विरुन जातो. तेव्हा हा निबंध आपल्याला आदिवासी जीवनाची ओळख करून देतो. आदिवासी समाज, त्यांचे कष्टमय जीवन, समाजातील स्त्रियांची सुखदुःखे यांचे मनोवेधक चित्रण प्रस्तुत निबधात आल्यामुळे या निबंधाला एक आगळीच उंची प्राप्त झाली आहे.

## ६. हिमावरील देवदार

चितमपल्लींनी या निबंधाचे शीर्षक हिमालयावरील देवदार न देता 'हिमावरील देवदार' हे नाव दिले आहे कारण हिमालयावर 'हिम' म्हणजे बर्फ भरपूर पडतो आणि या हिमवर्षावामुळे हे वृक्ष खुरटे, वेडेवाकडे, झुडपाप्रमाणे ओणावलेले दिसू लागतात. हिमालयात या वृक्षांची उंची जास्तीत जास्त असते. देवदाराचे काही प्रकार फक्त हिमालयातच वाढतात. कस्तुरी मृगाप्रमाणे स्वतःचा सुगंध आपल्याच पानापानातून सर्वत्र दरविळवणारे हे वृक्ष आहेत. देवदार वृक्षाच्या सुगंधाने हिमालयाची शिखरे सुगंधित होतात. हिमालयाची शोभा वाढविणाऱ्या या वृक्षाचे वर्णन लेखकाने अत्यंत सहज सुंदर भाषेत रेखाटले आहे.

दादा गोरे यांना असे वाटते की, "हिमावरील या लेखात चितमपल्लींनी देवदाराचे आठप्रकार कसे आहेत, कालीदासांच्या कुमार संभवात देवदाराचे वर्णन कसे आहे हे तर देतातच परंतु चिनी लोकगीताचीसुध्दा त्यांना आठवण होते."[१८] दादा गोरे याचे म्हणणे यथोचित वाटते कारण एका चिनी युवतीच्या मनातील काव्याचा उल्लेख या

निबंधात आलेला आहे. **I ride a coach with lacquered sides, My love riders a dark piebald horse. Where shall we bind our hearts as one? On west mount, beneath the pines and cypresses.** प्रणयी युगलांना देवदार वृक्षाच्या सावलीतच चिरशांती लाभत असे. त्यानंतर 'देवदार' वृक्षाला देवदारच का म्हणतात? तर दिव्याने दिवा लावावा त्याप्रमाणे या वृक्षाच्या शेंड्यांना प्रत्येक वर्षी १० ते १२ कोंब येऊन त्याचे अगणित ज्योतीत रूपांतर होते त्यामुळे या वृक्षांना 'देवदार' म्हणतात. असे गूढ लेखकाने उलगडून दाखविले आहे. पिरॅमिडचा आकार देवदार वृक्षासारखा का आसावा याचं गूढ लेखकाला चिनी लोकांच्या देवदार वृक्षाच्या प्रेमात दिसून आले. पिरॅमिड बनविणाऱ्या शिल्पकाराचं चितमपल्ली मनापासून कौतुक करतात.

प्रस्तुत लघुनिबंधात कालिदासाचे कुमारसंभव, चिनी युवकाची प्रेमकथा यात देवदार वृक्षाच्या नावातील सौंदर्य व सौंदर्यदृष्टी दिसून येते. निबंधाचे सौंदर्य त्यातील शैलीने खुलून दिसते. देवदार वृक्ष जसाच्या तसा आपल्या मनःचक्षूसमोर उभे करण्याचे सामर्थ्य लेखकाच्या लेखणीत आहे हे जाणवल्यावाचून राहत नाही.

## ७. नाजूक कटीचे वीपिंग विलो

'वीपिंग विलो' वृक्षाचे सौंदर्य या निबंधातून दिसून येते. चीन देशात मैलच्या मैल या वृक्षाची लागवड केली जाते. ही झाडे सुंदर असतात. म्हणून अशा वृक्षाची निवड भावसंज्ञेसाठी केली जाते. उदाः– देवदार–वैभव, बांबू–घरे, अशोकवृक्ष–स्त्रिया इ. असे साहचार्य दिसून येते दादा गोरे यांचे मते, " नाजूक कटीचे वीपिंग विलो हा लेख असा आहे की, चीन देशातील हा वृक्ष सुंदर तर आहेच याशिवाय आरस्पानी जलाशयाकाठच्या विलो वृक्षांचे मनोहारित्व वनस्पतीसृष्टीत अद्वितीय कसे आहे हे चितमपल्लीं सांगतात."[१७] चितमपल्लींनी 'वीपिंग विलो' या वृक्षाचे सौंर्य आणि फायदे सांगितलेले आहेत. मध्यम आकार, फांद्यांचा विपुल विस्तार, पिसाऱ्याप्रमाणे दिसणारे फांद्यांचे शेंडे. ओणावलेले असे वीपिंग विलो नदी, सरोवरे व जलाशयांच्या काठ शोभिवंत करतात. या वृक्षांचे फायदे म्हणजे ते पाणलोटातील जमिनीची धूप थांबवितात. या वृक्षांचे मूळ उत्पत्तिस्थान चीन देशात आहे. हे वृक्ष बॅबिलॉन नदीकाठी येतात. म्हणून त्याचे नाव 'सूलिक्स

बॅबिलोनिका' पडले. चिनी कवी लिन युगांत म्हणतो, 'It is the feminine treepar execellence' सुदर युवतीच्या वक्र भुवयांसाठी willow's eyebrows ही संज्ञा वापरली जाते. चिनी नर्तिका या वीपिंग विलोचे अनुकरण करतात. तसेच चीन देशात पूर्वी अशी प्रथा होती की, परदेशात जाणाऱ्या आपल्या प्रियकराला प्रेयसीने विलोची फांदी भेट द्यायची. चितमपल्लींनी चीन देशातील प्रथा परंपरासुद्धा बारकाव्याने उल्लेख केलेला आहे. त्यामुळे त्यांचे लेखन हे फक्त भारतीय वृक्षांवरचे नाही. दादा गारे म्हणतात, "चितमपल्लींचे लेखन फक्त भारतीय वृक्षांवरच आहे असे नाही . देशाच्या सीमा ओलांडून अनेक वृक्षांचा केलेला चितमपल्ली यांचा अभ्यास थक्क करणारा आहे. या लेखनामागे चितमपल्ली यांची प्रचंड साधना असल्याचा प्रत्यय सातत्याने येत राहतो."[१८] दादा गोरे यांचे म्हणणे यथायोग्य वाटते.

या निबंधावरून लेखकाची प्रचंड साधना आणि अभ्यासुवृत्ती दिसून येते. या वृक्षाचे महत्व, सौंदर्य, वृक्षाशी असलेले तरुण मनाचे नाते, त्यांच्या भावभावना रेखाटण्यात चितमपल्ली यशस्वी झाले आहेत. या वृक्षाचे मानवी जीवनातील स्थान अत्यंत मोलाचे आहे हे लेखकाने अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट केले आहे. आपल्या भावना व्यक्त करण्यात लेखकाची शैली त्याला उपयोगी पडली आहे.

## ८. देवभात

या लघुनिबंधाची सुरूवात संस्कृत वाक्याने होते. पण इथे लेखकाने संस्कृत वाक्याचे मराठी अर्थासह विवेचन केले आहे, 'नीवारा : एक शुक–कोटरार्भक–मुख–भ्रष्टस्तरुणामधः।" (अभि. शांकुतलम्–१/१४) घरट्यात बसलेल्या पोपटाच्या पिलाच्या चोचीतून सांडलेला देवभात वृक्षाखाली पडला आहे. यावरून असे वाटते की, तो देवभात पाहून चितमपल्लींना हे शीर्षक सुचले असावे.

भंडारा जिल्ह्यात जवळजवळ तीस हजार तळी असल्याने हा प्रदेश तलावांचा प्रदेश म्हणून सर्वपरिचित आहे. या निबंधात चितमपल्लींना देवभाताचं रहस्य उलगडून दाखवलं आहे. पहाटेच्या काळोखात आदिवासी स्त्रिया देवभात गोळा करतात. त्या स्त्रियांना

वाटते देवभात म्हणजे देवाघरचे धान आहे ते सूर्य उगवायच्या आतच गोळा केले पाहिजे. मुलाखतीमध्ये चितमपल्ली सांगतात, " ही आदिवासी माणसं या देवभाताला देवाघरच धान मानतात आणि हा देवभात आपोआप येत असल्याने आदिवासींकडून त्याला देवभात हे नाव पडले आहे."[१९] यावरून चितमपल्लींची संशोधक वृत्ती दिसून येते निसर्गातील कोणत्याही घटकाचे रहस्य लेखक आत्मियतेने जाणून घेतो. त्यामुळे वाचकालाही या रहस्यांची उकल होते. मनाला भावण्यासारखे जलाशयाचे सौंदर्य चितमपल्लींनी टिपलेले आहे. व्यंकटेश माडगूळकर म्हणतात, "इटिया डोहाप्रमाणेच खोल विस्तृत आणि स्वयंप्रकाशित असा वनविद्येचा साठा मारुतरावांपाशी आहे."[२०] माडगूळकरांचे म्हणणे यथायोग्य वाटते. कारण चितमपल्लींना वनविद्येचे भरपूर ज्ञान आहे.

देवभातावरुन उडत जाणारा पक्ष्यांचा थवा, जलाशयात पडलेले आकाशाचे प्रतिबिंब, हिरव्यागार देवधानाने भरलेला सरणा, मन मुग्ध करणारे सारस पक्ष्याच्या जोडीचे नृत्य, शेकडो लक्षावधी पाकोळ्या, खड्या, ढोकरी अशा विविध पक्ष्यांच्या आवाजाने देवधानाने भरलेला सरणा गजबजून गेलेला दिसतो. या लघुनिबंधात चितमपल्लींनी दुर्मीळ अशी निसर्ग दृश्ये टिपलेली आहेत. त्यामुळे हा निबंध अधिक प्रभावी वाटतो. अत्यंत तन्मयतेने चितारलेल्या या निसर्ग वर्णनाने वाचकाचे मन मोहून जाते. वाचकसुद्धा या दृश्यांशी आपोआपच तादात्म्य पावतो, एकरूप होतो. हेच या लघुनिबंधाचे यश म्हणावे लागेल.

## ९. पक्षिगान

पक्षाच्या सौंदर्याचे रहस्य मानवाला ऋग्वेदकालापासून वाटत आले आहे. अशीच पक्षी जीवनातील रहस्याची उकल चितमपल्लींनी या लेखात केली आहे. वन आणि पशुपक्षी हा चितमपल्लींचा आवडता अभ्यासाचा विषय आहे. त्यासाठी त्यांनी अनेक दिवस अन् रात्री जंगलात काढल्या. अनेक ग्रंथांचा अभ्यास केला हजारो मैलाचा प्रवास केला आणि त्यावर चितमपल्लींचा जंगलवेडा पिंड उभा राहिला. या जंगलदर्शनातून लेखकाने पक्ष्यांचे सौंदर्य टिपले. उदा:– हिरव्या वनश्रीतून विद्युतगतीने निळ्या रेषा ओढणारा खंड्या, निळ्या आकाशाचा भार पेलवत उडणारे निळे चास, शिरीष पुष्पाप्रमाणे कोमल हरीत इ. अशा उपमा देऊन पक्ष्याच्या सौंदर्याचे वर्णन चितमपल्ली करतात त्यामुळे ते सौंदर्य

नजरेसमोरून हटत नाही. माडगूळकरांचे मत या लघुनिबंधास यथायोग्य वाटते. उदाः— घरट्यात बसलेल्या कावळीचा स्वर, पहाटेपूर्वीच्या काळोखात आकाशमार्गाने वेगात जाणाऱ्या वन्य बदकांचा स्वर इ अशी गोजिरवाणी पाखरं गुंजन करू लागली की, चितमपल्लींना अस्फुट ओठ उघडलेल्या सुतनूची आठवण होते तसेच या पक्ष्यांची घरटीही सुंदर असतात. त्या घरट्यांकडे आपले प्राचीन लोक सौंदर्यात्मक दृष्टीने पाहत, पक्ष्याचे रूप पाहून अनेक स्त्रियांनाही त्याचा मोह होतो. चितमपल्लींनी दिलेल्या दाखल्यावरून याची प्रचिती यते. उदाः— मुळातच अलौकिक असणाऱ्या गंधर्व स्त्रियांनासुद्धा पक्ष्यांचे रूप घेण्याचा मोह आवरत नाही. अगस्ती ऋषींची पत्नी लोपामुद्रा हिला लोपा—सी गल पक्षाचे रूप लाभलेले होते. दादा गोरे याबद्दल म्हणतात, "असे दाखले देऊन चितमपल्ली पक्षीसौंदर्याची वैशिष्ट्ये वर्णन करतात. पक्ष्यांची सुंदर सुंदर घरटी आपले मन कसे मोहवितात. याचे वर्णन काव्यात्म पातळीची आनंद वाचकाला देतात. पक्ष्याच्या सौंदर्याची उकल चितमपल्ली मोठ्या काव्यात्म पातळीवर 'पक्षीगान' या लेखात करतात."[२१] चितमपल्लींनी पक्षीजगातील ती गूढे जाणून घेण्याचा प्रयास केला त्याचेच, मनोहारी दर्शनही या निबंधात घडते. विणीच्या काळातील पक्ष्यांचे सौंदर्य हे कौतुक करण्यासारखे असते.

प्रस्तुत निबंधात लेखकाने पक्ष्यांचे, त्यांच्या घरट्याचे अनेक बारकावे सूक्ष्मतेने टिपले आहेत. या लेखनातून लेखकाची सौंदर्यदृष्टी जीवनाकडे आशावादी दृष्टीने पाहण्याचा कल, निसर्ग सौंदर्यात रममाण होणारे रसिकमन व अभ्यासूवृत्ती डोकावताना दिसते.

## १०. असं जीवन पाणपिपुलीचं!

'पाणपिपुली' नाव सर्वसामान्यांना परिचित नसते त्यामुळे लेखकाने प्रथम पाणपिपुलीचा परिचय करून दिला आहे. चितमपल्लींनी पाणपिपुली या प्रस्तुत निबंधात अतिशय सूक्ष्म पद्धतीने या पक्ष्यांच्या जोडीचे जीवन दर्शन घडविले आहे. पापिपुलीचं चालणं, वागणं. पिलांना भरवण्याची पद्धती, त्या पिलांचे रंगरूप, त्यांची अनुकरण करण्याची पद्धती त्या नराची आपल्या पिलांच्या संरक्षणाची पद्धती त्या दोघांच्या मनात एकमेकांविषयी आणि आपल्या पिलांविषयी असणारं प्रेम, इ. अशा पद्धतीने पाणपिपुलीच्या जीवनाचा धांडोळा लेखकाने घेतला आहे. 'पाणपिपुली निरनिराळ्या मधुर स्वराने नराला साद घालते.

तेव्हा तो नर देहभान विसरुन तिच्याकडे धाव घेतो. यावरून त्या दोघांचे एकमेकाविषयी असणरं प्रेम व्यक्त होताना दिसते घरट्यातून बाहेर पडताना मात्र पाणपिपुली अंडी गवताने झाकून ठेवायची. पाणपिपुली अन्न गोळा करीत असली तर तिचं सारं लक्ष घरट्याकडे असे. यावरून पाणपिपुलीचं मातृहृदय दिसून येतं. पिलांना ती उड्डाणाचे धडे देते. पिलांना अन्न शोधायला, पाण्यात पोहायला शिकवते. पिलही तिचं अनुकरण करतात. सुहास पुजारी म्हणतात, एकदा पाणपिपुलीच्या नराला झिलनीवर घिरट्या घालणारा पाणससाणा दिसला. त्याला पाहून नर घाबरला आणि आपल्या पिलांना पंखाखाली घेऊन तो पिंटुडीच्या जाळीत गडप झाला. एक पिता या त्याने तो नर पिलांची काळजी घेतो. त्या नराचं पिलांविषयी असणारं वात्सल्य इथं व्यक्त होताना दिसते.

पाणपिपुलीचा 'पि–पि–पियु–पि–पि–पियु' असा आवाज आला की तो नर वेडयासारखा धावत तिच्याकडे जात असे. इथे लेखकाने सूक्ष्म निरीक्षणाने त्या पक्षाचा आवाज टिपला आहे. पाणपिपुली अंगानं थोराड, तपकिरी रंगाची, पंखावर सोनेरी वर्ख असलेली अशी होती. पाणपिपुलीच्या सौंदर्याचे वर्णन इथे दिसून येते. ती दोघे मिळून कमळाच्या पानावर घरटे करतात. आणि आपल्या पिलांसह घरट्यात स्थानापन्न होतात. इतक्यात कुंभार कुकड्याचा आवाज आला आणि ती पिलं जागच्या जागी निःस्तब्ध निजली. यावरून असे वाटते की, मरणाची भीती ही प्रत्येक जीवाला असते. संरक्षणाची काळजी ही प्रत्येकाला असते. त्यामुळे ती पिले शांत झोपी जातात. पाणपिपुली कमळाच्या एखाद्या पानावर उभी राहून पाण्यातील चिलाचा पुंजका बाहेर काढून त्यातील कृमी कीटक व घोंगल्या वेंची. यावरून तिची अन्न शोधण्याची पद्धती दिसून येते आणि पिलांनाही ती हीच शिकवण देते. डॉ. सुहास पुजारी म्हणतात, "पिलांना उड्डाणाचे धडे देणाऱ्या अन्नदात्रीचे हृदय चित्र चितमपल्ली रेखाटतात. असे जीवन पाणपिपुलीचं या लेखात त्यांनी पक्ष्यांचे भावपूर्ण रीतीने व्यक्त केलं. आहे."[२२] चितमपल्ली या निबंधात पक्षी जीवनातील अंतरगाचे दर्शन घडवतात.

## ११. पक्ष्यांच्या जन्माचे गूढ

या निबंधात सृष्टीतील एक चमत्कार आपल्या निदर्शनास येतो. प्रत्येक पक्षी आपापल्या पिलांना भरवत दिवसेंदिवस वाढवत असतात. परंतु चातक व पावशा हे कोकिळा

कुळातील पक्षी मात्र आपली अंडी कसाई–खाटीक–पक्षी व सात बहिणीच्या घरट्यात घालतात आणि तेही एका घरट्यात एकच ठेवतात. हा खाटीक पक्षी पावशा पक्ष्यांच्या पिलांच्या रूपाने जगतो. 'सात बहिणी' चातकांच्या पिलावर मायेची पाखर घालतात कर्णकर्कश कोल्हाळ माजविणाऱ्या पक्षात या सुस्वर गाणाऱ्या पक्षाचा जन्म होतो हा एक चमत्कारच आहे. असे वाटते की, ही देवाचीच करणी आहे. जोत्स्ना आफळे म्हणतात, "मारुती चितमपल्लींनी वन्यजीवनाचा अनुभव घेऊन त्यावर अभ्यास करून ललित लेखन केले आहे."[२३]

या निबंधात सात बहिणींच्या गूढतेचीही उकल केली आहे. कारण प्रथम चितमपल्लीनाच प्रश्न पडला होता की, सातच का? सहा का नाही? नंतर हे रहस्य उलघडले. एकूण ती क्वचितच सात पाहायला मिळतात. त्यात तर चार पाच त्यांची पिले असतात. सात ही संख्या भारतीयांना प्रिय आहे. पण इंग्रजांनी देखील आपलेच अनुकरण केले आहे. तेही सेव्हन–सिस्टर्सच म्हणतात. ती पिले विलक्षण स्वरात केकाटतात म्हणून कोकणात त्यांना कोकाट्या, जंगल बॅबलर म्हणतात. इथे इंग्रजी शब्द आलेला आहे 'कसाई पक्ष्यांची पिलं' चिमणी एवढी करड्या उदी रंगाची कुशीत किंचित ठिपके असलेली अशी असतात. या निबंधात आलेली एक हृदयस्पर्शी कथा वाचून सृष्टीच्या चमत्काराची जाणीव होते. एके दिवशी सात बहिणींच्या पिलांबरोबर ते चातकाचे एक शावकही केकाटत होते. प्रथम तिने त्याच्याकडे दुर्लक्ष केले आणि ती आपल्याच पिलांना भरवत राहिली नतर क्षीण स्वरात पी–पीच! आवाज करीत ते त्या व्रात्य पिलांपासून दूर असलेल्या अजाण पिलाची कीव आली. तिने त्याच्या चोचीत चारा भरला. पी–पी–पी करीत चोच वासून त्याने तो चारा घेतला. इथे खूप जिव्हाळ्याचा क्षण टिपलेला आहे. शिवाय आईचे वात्सल्य दिसून येते. आई ही आईच असते. मग ती कुणाचीही असेल, म्हणजे पाखरं, पक्षी, प्राणी सर्वांची सर्वांमध्ये आईचं हृदय हे सर्वश्रेष्ठ ठरते. खरोखरच हा सृष्टीवरील एक अद्भूत चमत्कार आहे.. कारण एरवी दुसऱ्या पक्षांची अंडी निर्दयपणे खाणाऱ्या या खाटकालाही अशी दया येते. चितमपल्लींनी हळुवार शब्दांत पक्षी जीवनाचे गूढ उकलून दाखविले आहे.

## १२. गिधाडांचा टापू

प्रथम प्रस्तुत निबंधात लेखकाने गिधाड या पक्षाचे जीवनचित्रण केले आहे.

पहाडाच्या कडेकपारीच्या आश्रयाने गिधाडे घरटी बांधून अंडी घालतात. शेकडो वर्षांपासून गिधाडे या परिसरात राहतात. याची माहिती लेखकाला आदिवासींकडून मिळाली विणीच्या काळात वृक्षावरील घरट्यात प्रचंड आकाराच्या पंखाच्या गृध्र युगुलांचे दृश्य मन विचलित करणारे असते. गिधाड या दुर्लक्षित अशा पक्ष्याचे सुद्धा विणीच्या काळातील सौंदर्य मनाला भावते. दादा गोरे म्हणतात, "गिधाडासारखा दुर्लक्षित पक्षीही चितमपल्लींच्या निरीक्षणातून सुटत नाही. ते गिधाडांचा जीवनव्यवहार आपल्यासमोर मांडतात." [२४]

त्याचबरोबर जंगलाचे सौंदर्य वाचकाच्या मनाला मोहात पाडते हिरव्यागार जंगलातून वेडीवाकडी वळणं घेत वाहणारी नदी तलावातील पाण्याचा पृष्ठभाग चांदीप्रमाणे उन्हात तळपतो. चिंचेचे दाट वृक्ष तिथे आहेत. आकाशात विहार करणाऱ्या पक्ष्यांच्या सावल्या जंगलावर पडलेल्या असतात. तसेच निळे हिरवे डोह अशा निसर्ग सौंदर्यात चितमपल्लींबरोबर वाचकही रमून जातो.

जंगलाच्या आधाराने ही गिधाडं राहत असतात. 'इटिया डोहाच्या सांडपाण्यापासून केशोरी उमरपायली हा वनमार्ग अरण्यातून जातो. सायंकाळच्या वेळी संध्याछाया दाटू लागताच आदिवासी लोकं आपापल्या निवासस्थानाकडे परतत असतात. ही आदिवासी माणसं जंगलातील बैचावे केवकांदा, वेळू वास्ते व वेळू साते. पावसाळ्यात बांबूच्या बेटात येणाऱ्या पांढऱ्या आळंबी खातात. पिढयान् पिढया निसर्गाच्या कुशीत गिधाड पहाडाच्या टापूत आणि वृक्षांना सोबत करून ही गोंड आदिवासी लोकं राहत असतात. यावरून असे दिसून येते की, गिधाड या पक्षाचे नाव ऐकलं तरी आपापल्या ते भयानक नाव वाटतं. पण ही आदिवासी माणसं मात्र इथं बिनधास्त राहतात. आदिवासींचे जीवनचित्रण या निबंधात आले आहे. त्या वनमार्गावर चालणाऱ्या आदिवासींना पाहून लेखकाला रॉबर्ट फ्रॉस्ट या अमेरिकन कवीच्या काव्याची आठवण होते,

**The woods are lovely dark and deep**
**But I have promises to keep**
**And miles to go before I sleep**
**And miles to go before I sleep**

इथे इंग्रजी काव्याचा संदर्भ आल्याने लेखन उठावदार बनले आहे. या निबंधाला काव्यात्मता प्राप्त झाली आहे. शिवाय गिधाडासारख्या दुर्लक्षित प्राण्याचा जीवनव्यवहार लेखकाने या निबंधात मांडला आहे.

## १३. टिबुकली

टिबुकलीचे वर्णन चित्रमय शैलीत केलेले आहे. उदाः— आकाराने कबुतराएवढी गुबगुबीत, भुरा रंग, पोट कोशा रंगाचे, लहान टोकदार चोच बिना शेपटीचा पाणथळ पक्षी. नर मादी दिसायला सारखेच असतात. झिलान, तळी पाणवनस्पती हे अशा ठिकाणी हे पक्षी जोडीने अथवा थव्याने राहतात. चित्रमय शैलीमुळे ती टिबुकली रंगरुपासह आपल्या नजरेसमोर येते. येथे चितमपल्लींच्या लेखनातील जिवंतपणा दिसून येते.

नवेगाव तळ्यात पाहिलेल्या टिबुकली या पक्ष्याच्या जोडीची कथा या निबंधात चितारलेली आहे. वाऱ्यावादळासह पाऊस बरसल्यानंतर जिकडे तिकडे हिरवेगार वातावरण निर्माण होऊ लागते. पक्षी आनंदाने बागडू लागतात. अशावेळी टिबुकली मात्र भान विसावून डोळे मिटून बेटासारख्या दिसणाऱ्या घरट्यात स्तब्ध बसलेली असायची. काही अंतरावर तिचा जोडीदार पोहत पोहत तिचे संरक्षण करीत असे. नर चोचीत चारा होऊन तिथे येतो. मग ती मादी मान लांब करून हळूच तो प्रेमाने दिलेला घास चोचीत घेते. यावरून त्या पक्ष्यांचं एकमेकांवर असलेले प्रेम दिसून येतं. जवळजवळ वीस एकवीस दिवस नर मादी दोघं अडी उबवितात. अन् शेवटच्या दिवशी पाच काळीभोर, चेंडूएवढी, मखमली पिलं बाहेर आली .चितमपल्लीने त्या पिलांच्या सौंदर्याचेही वर्णन केले आहे. नतर थोड्या वेळाने नर मादी पाण्यात उतरली आणि आपल्या पिलांना साद घालू लागली ती बावरी पिल धावत येताना पाण्यात पडली अन् तिथंच पोहू लागली. दुसऱ्या दिवशी तर स्वतःची स्वतः बुडी घेऊ लागली यावरून असा प्रत्यय येतो की मानवाची मुल. जन्मल्याबरोबर लगेच उठून लगेच चालत, बोलत नाहीत. पण प्राणी, पक्षी, मानव आणि प्राण्यांमध्ये हाच फरक जाणवतो. टिबुकली त्या पिलाला उडणाऱ्या माशा कशा पकडायच्या देवधानावर बसलेले कृमिकीटक कसे टिपावेत. पारळीचं बी कसं खावं याचे पाठ देऊ लागते.

पाहता पाहता पिलं मोठी झाली, स्वतःची काळजी घ्यायला समर्थ झाली. पुनः टिबुकलीने घरटे बांधले अंडी घातली पुनः चार पिल दिसली. पूर्वीची पिलं आपल्या भावंडांना सांभाळण्यात मातापित्यांना मदत करतात. यावरून टिबुकली या पक्ष्याच्या सुखी कुटुंबाचे दर्शन घडते. हा निबंध कथात्मक पातळीवर उतरतो. शिवाय यावरुन असे प्रत्ययास येते की, पक्षी आपली पिले आयुष्यभर सांभाळत नाही परंतु मानवाप्रमाणे आई वडील या नात्याने पिलाची सर्वोतोपरी काळजी घेतात पूर्वीची पिलं. नंतरच्या पिलांना सांभाळतात. यावरुन त्या पक्ष्यांच्या कुटुंबामध्ये एकमेकांविषयी खूप प्रेम असल्याचे जाणवते.

## १४. पैल तो गे काऊ

निबंधाच हे शीर्षक वाचलं की पैल तो गे काऊ कोकताहे...— ही ज्ञानेश्वरांची विराणी आठवते. डोळ्यासमोर ज्ञानेश्वरांचं साहित्य उभं राहतं. चितमपल्लीनी प्राचीन साहित्य आणि आध्यात्माचाही अभ्यास भरपूर केलेला आहे. त्यामुळे तर त्यांना इतकी सुदर शीर्षक लगेच सुचतात.

कावळयाचं वर्णन चितमपल्लींनी सौंदयार्त्मक लेखनशैलीत केले असल्याने काळ्याकुट्ट कावळयाचेसुद्धा सौंदर्य या निबंधात खुलून दिसते. लेखकाने बालपणी ऐकलेला कावळ्याचां आवाज म्हणजे त्यांच्या बालमनावर कोरलेले हे ध्वनीचित्र कधीही पुसट झाले नाही. चितमपल्लींनी कावळ्याचे वेगवेगळे आवाजही टिपलेले आहेत, उदाः— रात्रीच्या गर्भातील कावळयांचा आवाज दिवसा ऐकू येणाऱ्या स्वरापेक्षा खूपच भिन्न असतो. बागेतील हिरव्या दुलाईत कावळे झोपलेले असतात. परंतु मध्यरात्र होताच एखाद्या वृक्षावरील थवा अचानक जागा होऊन काव काव करू लागतो. त्यामुळे इतरही कावळे ओरडतात. याला रात्रीच्या गर्भातील आवाज म्हणतात. जेव्हा रिमझिम पाऊस चालू होतो तेव्हा मात्र 'कावळे शांत एके ठिकाणी सगळे मिळून बसलेले असतात. काही काळ शांत राहिलेले हे कावळे या महिन्यात घरटी बांधतात, इथे चिमतपल्लींनी कावळ्यांच्या विविध आवाजाची ओळख करून दिलेली आहे. याचा प्रत्यय येतो. डॉ. सुहास पुजारी म्हणतात, "चितमपल्ली यांच्या ललित गद्याने हे पक्ष्यांचे क्षितीज विस्तारले."[२७] चिमणी, कावळा, कोकिळ, पोपट हे पक्षी मराठी ललित गद्यामध्ये अल्प प्रमाणातच आढळतात. परंतु चितमपल्लींनी मात्र या पक्ष्यांच्या

जीवनाचा वेध घेतला आहे. इथे लेखकाच्या सूक्ष्म निरिक्षण शक्तीचा प्रत्यय येतो. त्याच्या नजरेतून कोणतेही पक्षी, प्राणी चुकत नाहीत.

या निबंधामध्ये एक हृदयस्पर्शी कथा आलेली आहे, 'नदीचं पात्र खोल होतं. त्याच्या काठाला लागून अर्जुनसादड्याचे वेडवाकडं वढलेलं झाड होते त्या झाडाला दरवर्षी नदीच्या पुराला तोंड द्यावं लागत असे, कधी कधी तर हा वृक्ष पूर्णपणे पाण्यात बुडून जाई. त्यावर्षी कावळ्यानं त्यावर घरटं केलं.आणि खूप पाऊस पडला. एक कावळी घरट्यात असणाऱ्या पिलाचं संरक्षण कसं होईल असा विचार करत एकाग्र बसली होती तेवढ्यात पूर आला आणि ती एकाग्र बसलेली कावळी पूराच्या पाण्याबरोबर वाहून गेली. आपल्या पिलाच्या काळजीने तिने स्वःनाशाची पर्वा न करता त्याग करून घेतला हा प्रसंग वाचून आपल्याही डोळयात पाणी उभे राहते. त्यामुळे हा निबंध अतःकरणाला स्पर्श करतो. कावळ्यासारख्या पक्षाचीसुद्धा चितमपल्लींनी दखल घेऊन त्याचे यथार्थ चित्रण प्रस्तुत निबंधात केले आहे.

## १७. रोजनिशीतील पाने

चितमपल्ली रोजच्या रोज आलेले अनुभव डायरीत नोंद करून ठेवत. तेच अनुभव त्यांनी या लघुनिबंधात मांडलेले आहेत. निळावंतीची भाषादेखील एक रहस्य आहे ही भाषा ऋषीमुनींनी सिद्ध केलेली आहे.'निळावंती म्हणजे पक्ष्यांची भाषा जाणणारे शास्त्र समजले जाते.' चितमपल्लींना ही भाषा समजते. त्यांच्या गुरूकडे त्यांनी ही भाषा अवगत केली आहे, म्हणूनच त्यांनी लेखनात प्राणी पक्ष्यांचे आवाज टिपलेले दिसून येतात.

हिरव्यागार 'होपिया' वृक्षांनी आच्छादलेल्या पालघाटातील डोंगरदऱ्या चितमपल्लींना आवडल्या. कच्छच्या रणातील पाक  हंसाची महानगरी लेखकाला एखाद्या अद्‌भूत गंधर्वनगरीसारखी रहस्यमान दिसली. मनाली परिसरात धुंकं फार असतं. चितमपल्ली म्हणतात, पहाटेचे तीन वाजले– मृग पक्षीशास्त्रावरील भाष्य आता लिहून झालं आहे. चैतन्यात हरविलेल्या तंद्रीतून मी जागा झालो. यावरून असे दिसते की, चितमपल्ली रात्र–रात्र अभ्यास करत असतात. ग्रंथ वाचत असतात. जंगलविषयीचे संदर्भ शोधत असतात आणि या अभ्यासात चितमपल्ली इतके ध्यानमग्न होतात की, पहाटेचे तीन कधी वाजले

हेसुद्धा लक्षात येत नाही. अशा अभ्यासातूनच त्यांचे सारे साहित्य साकारलेले आहे चितमपल्लींच्या मनात निसर्गाविषयी अप्रतिम जिव्हाळा आहे, प्रेम आहे, आत्मीयता आहे हे येथे जाणवते.

या लघुनिबंधामध्ये लेखकाची भाषा काव्यात्म बनते. डॉ. सुहास पुजारी म्हणतात, "चितमपल्ली यांच्या ललित लेखनाची भाषा ही काव्यात्म आहे. ती स्वभावतःच सुंदर आहे. एका अर्थाने हे 'जंगलाचं देणं'च आहे."[२६] भरतपूरमध्ये विस्तीर्ण जलाशय आहे. गाणारी झाडं आहेत. ग्रहनक्षत्रमंडळाचे पाण्यातील नितळ प्रतिबिंब आहे. दिव्याबरातून उडणाऱ्या पक्षांची सुंदर स्वप्नं पाहत इला नावाची तरुणी सातासमुद्रापलीकडून इथं आली होती. तिचा इथच अंत झाला. देशोदेशीून आलेला पक्षी समुदाय पाहून चितमपल्लींना असं वाटतं की, ती दोन पाखरं लेखकाच्या गतस्मृतीवर हळूवार पाखर घालीत आहेत आणि लेखक साश्रुनयनानं त्या समाधीवर न लिहिलेली अक्षर वाचू लागतो.

'पक्ष्यांची पावलं आकाशात
दिसत नाहीत,
प्रज्ञावान माणसाची पावलं
भूमीवर दिसत नाहीत.

असे हे काव्य चितमपल्लींच्या मनात उभे राहाते. निसर्ग, प्राणी आणि असे वर्णन करताना चितमपल्ली मनोमन हरवून जातात. त्यांची भाषा आपोआपच काव्यरूप धारण करते. याचा प्रत्यय या विबंधावरून येतो. आपल्या दैनंदीनीतील काही प्रसंग लेखकाने येथे नमूद केले आहेत. ते प्रसंग इथे सुरेख उतरले आहेत.

## १६. घर माझे बांधावर

प्रस्तुत लघुनिबंधामध्ये चितमपल्लींनी वन्य प्राण्यांची ओळख करून दिलेली आहे. लेखक स्वतः लिहितो की, 'जलाशयांविषयी मला गूढ प्रेम वाटतं. त्यांच्याशी जन्मोजन्मीचे ऋणानुबंध असावेत असं वाटतं.' यावरुन चितमपल्लींच्या मनात असणारा निसर्गाविषयी जिव्हाळा दिसून येतो. याशिवाय चितमपल्लींनी प्राण्यांच्या पाऊलखुणांवरुन कोणते प्राणी कोणत्या मार्गाने कशासाठी गेले असतील हे ओळखता येते. उदा. :— लेखकाला गव्याची

वीतभर खोल पावलं मातीत उमटलेली दिसली त्यावरून लेखक म्हणतो, तो गवा प्रचडकाय असावा तो एकटाच भटकत असावा. इथे चितमपल्लींचे लेखन हे शास्त्रीय पातळीवर उतरते. कारण चितमपल्लींना प्राणीशास्त्राचे ज्ञान अवगत आहे. इथे प्राणी शास्त्रज्ञ म्हणून चितमपल्लींची ओळख पटते. डॉ. सुहास पुजारी यांच्या मते, "चितमपल्ली जसे प्रख्यात लेखक म्हणून ज्ञात आहेत, तसेच वन्यजीवनिरीक्षक म्हणूनही त्यांची ख्याती आहे. वाचन, संशोधन आणि लेखन ही त्यांच्या जीवनाची त्रिसूत्री आहे."[२७] पुजारींचे हे मत चितमपल्लींना अगदी यथायोग्य लागू पडते.

रणजित देसाई, चंद्रकुमार नलगे, निरंजन घाटे या लेखकांच्या लेखातून जसे जंगल दर्शन घडते. वन्यप्राण्यांची ओळख होते. तसेच चितमपल्लींनी जंगलातील वन्यप्राण्यांच्या वन्यजीवनाची ओळख करून दिली आहे. रणजित देसाई यांच्या 'मोरपंखी सावल्या' या पुस्तकात अनेक वन्य पशूपक्ष्यांनी वर्णने आली आहेत. उदा. :– "जंगलाच्या टापूवर करवंदीच्या जाळ्यातून चितळे विसावली, कोल्ही, तरसे आपापल्या घळणीत विसावली. वाघळे झाडावर लटकली आहेत. वडाच्या ढोलीत घुबड शिरले होते. ससे बिळाबाहेर तोंड काढून समोरच्या गवतावर पडणाऱ्या दवाकडे पहात होते. रातकिड्यांचा आवाज कमी होत होता. साऱ्या जंगलावर पहाटेचा प्रकाश पडला होता."[२८] याप्रमाणेच चितमपल्लीच्या लेखनातही जंगलातील प्रण्यांचे जीवन पहावयाला मिळते. तसेच या निबंधामध्ये चितमपल्लींनी वेगवेगळे आवाज वर्णिले आहेत. उदा. :– जंगलात कवडे, होले, पारवे इ. पक्षी विविध स्वरात ओरडायचे लेखक याला पक्ष्यांचे संगीत म्हणतो. पक्ष्यांच्या आवाजात विविधता असते. पक्षी फक्त गोड आवाज काढतात असं नाही तर काही वेळेस हे सुंदर दिसणारे पक्षी अद्‌भूत विस्मयजनक असाही आवाज करू शकतात. चितमपल्लींनी त्याचे सूक्ष्म निरीक्षण केले आहे. चितमपल्लींना अरण्यविद्या अवगत असल्यानेच या निबंधात त्याचे वर्णन आले आहे. निबध अत्यंत रोचक व आकर्षक झाला आहे.

## १७. अशी पाखरे येती

या निबंधामध्ये आपल्याला अनेक पक्षी पहायला मिळतात. जंगलात न जाता या पक्षांचं जीवनदर्शन घडते. पक्षी कसे दिसतात, खातात, पितात, कसं जीवन जगतात,

त्यांचा आवाज कसा आहे. इ. सर्वाची ओळख या निबंधातून होते. दादा गोरे यांना असे वाटते की, "अशी पाखरे येती, यामध्ये अनेक पख्यांचे संदर्भ येतात."[२९] दादा गोरे याचे म्हणणे यथायोग्य वाटते. सात कोकणी लावा लेखकाला शामल शंखाप्रमाणं सुंदर दिसल्या. चिमणीएवढाले एक पाखरू आकाशातून उडताना चितमपल्लींनी पाहिले. तेव्हा त्यांना वाटले 'हे त्यांचं अठरा लक्ष योजनेचं उड्डाण पुनर्निमितीकरिता होतं. रत्नाचं सौंदर्य त्याला प्राप्त झालं होतं. यावरून चितमपल्लींची भाषाशैली चित्रमय आहे. याचा प्रत्यय येतो अतिशय सुंदर अशी शब्दरचना इथे पहावयास मिळते.

चितमपल्लींची आजी निळावंतीची पोथी वाचत असे. निळवंतीच्या पोथीतील अनेक रहस्य ती चितमपल्लींना सांगत असे. त्यामुळे चितमपल्लींनीही निळावंतीचं, रहस्य जाणलं होतं. जगलात कित्येकदा असं होतं. कोतवाल पक्षी हा बहिरी ससाणे व श्येन पक्षी यांना हुसकावून देण्यासाठी त्यांचा पाठलाग करीत असतो. वृक्षांवर अनेक पक्षी घरटी करतात. देवधानावर संध्याछाया पडू लागल्या की, बुलबुल या पक्षाची गोड किलकिल ऐकायला मिळते. पाणकोंबड्या झिलनीवर येताना दिसतात. धीवर आपल्या डोंगी किनाऱ्याकडे झपाट्याने वल्हवित असतात. सायंकाळच्या वेळी प्रत्येक जीवाला आपल्या घराकडे धाव घेण्याची ओढ लागलेली असते. किनाऱ्याकडे हे धीवरसुद्धा घरी जाण्याच्या ओढीने भरभर डोंगी वल्हवितात. या प्रस्तुत निबंध वाचनातून आपापल्या जंगल दर्शन घडते.जंगलातील विविध घटकांचे सौंदर्य मनास भावते, 'निरंजन घाटे' यांनीही निसर्गाचे, जंगलाचे दर्शन घडविले आहे. परंतु चितमपल्लींनी 'जंगलातील सर्व जीवांसह जंगलाचे अंतरंग उलगडून दाखविले आहे.

## १८. पऱ्यांचा परिसर

या निबंधामध्ये एकप्रकारची अद्‌भूतता आणि गूढता डोकावताना दिसते. त्यामुळे हा निबंध कथात्मक वाटतो. या कथा कधी स्पष्ट जाणवतात. तर कधी अस्पष्ट जाणवतात. त्यामध्ये जी अद्‌भूतता आणि गूढता आहे ती मूळात निसर्गातच असल्याने हा निबंध अत्यंत लालित्यपूर्ण झाला आहे. दादा गोरे म्हणतात, "जंगलातही एक प्रकारची गूढ अद्‌भूतता असते. असा प्रत्यय 'जंगलाचं देणं' या लेख संग्रहातील 'पऱ्याचा परिसर', 'दिवा

आणि दिवारु', 'सांबराचे लोटण', चांदमारी हे लेख देतात."[३०] चितमपल्लींचे सारे आयुष्य जंगलात गेलं परंतु त्यांनी हातातील बंदुक वन्य प्राण्यांवर कधीही रोखली नाही, कारण वन्यप्राण्यांवर लेखकाचे प्रेम आहे. या निबंधात परीच्या एका गाण्याचा संबंध येतो.

**up the airy mountion**
**down he rushy glan**
**We daren't to a hunting**
**for far of litle men**

शिकाऱ्याच्या बंदुकीला जंगली जनावरे बळी पडतात. त्याप्रमाणेच आपल्याला न दिसणारी छोटी छोटी माणसंही हकनाक बळी पडतात. चितमपल्लींना याची चिंता वाटत असल्यामुळे त्यांनी याचा उल्लेख केला आहे. इंग्रजी काव्याचा संदर्भ आल्याने निबंधाची गूढता अधिक वाढते आणि ही एक काव्यात्मक भावकथा ठरते. त्यामुळे या निबंधात गूढता आणि भावनात्मकता साकारलेली आहे. याचे प्रत्यंतर येते. त्यानंतर चितमपल्लींची मुलगी छाया पऱ्यांबरोबर खेळायची असा उल्लेख इथे येतो. मुलाखतीमध्ये छायाने स्वत. सांगितले आहे की, "त्यावेळी माझ्याबरोबर खेळायला यायच्या त्या पऱ्या नव्हत्या तर धुसर अशा पऱ्यांच्या प्रतिमा मला दिसायच्या."[३१] चितमपल्लींनी वाचलेली यॉर्कशायर इथल्या दोघी बहीणींची सत्यकथा याचाही संदर्भ या निबंधात येतो. १९१७ च्या वसंत ऋतूत 'एल्सीं आणि फ्रान्सिस ग्रिफिथ' या मुलींनी पऱ्यांबरोबर मैत्री केली त्यांचे फोटो घेतले त्यावर पोलीस अधिकाऱ्यांनीही बारकाव्याने चौकशी केली असता असे दिसून आले की, त्या पऱ्या परंपारिक पद्धतीच्या होत्या. या अद्भूतपूर्व घटनेवर डॉयलने 'कमिंग ऑफ फेअरीज्' हा ग्रंथ लिहिला म्हणून असे म्हणावेसे वाटते की पऱ्या अस्तित्वात आहेत. पऱ्यांचंही सवतःच असं एक जग आहे.

याशिवाय आणखी एका कथेचा संदर्भ या निबंधात आला आहे. एकदा एका कोळ्याला जाळ्यात एक मत्स्यपरी सापडली त्या कोळ्याने तीला घरी नेले. तिच्याबरोबर विवाह केला त्या दोघांना मुलं वगैरे झाली परंतु अचानक एक दिवस त्या परीला तिची गळून पडलेली शेपटी सापडते आणि शेपटी घेऊन ती परी आनंदाने समुद्राकडे निघून जाते. यावरून असे प्रत्ययास येते की, त्या परीने स्वतःच्या मुलांचा, संसाराचा, नवऱ्याचा कशाचाही

विचार केला नाही. सगळं सोडून ती निघून गेली. आपल्याकडील हिंदू स्त्री कितीही संकटांना तोंड देईल परंतु संसार सोडून ती कधीच निघून जाणार नाही. चितमपल्लीच्या लेखनातील सामाजिकता इथे दिसून येते. निबधाच्या शेवटी लेखकाने परीसर या शब्दाची व्युत्पत्ती करून दिलेली आहे. लेखक म्हणतो, 'पऱ्यांचा सरतो परिसर' या पऱ्यांना वाचवा म्हणजे सारा परीसर आपोआप वाचेल' चितमपल्लींनी परिसर या शब्दाची जी उकल केली आहे. ती गूढरम्य वाटते गूढ उकलण्याचा ललित प्रयत्न चितमपल्ली करतात. त्यांच्या या अद्‌भूतेत वाचक गुंतून जातो.

पऱ्यांच्या परिसर चितारताना चितमपल्लींनी अनेक परिकथांचा संदर्भ देऊन आपल्या लेखनास सत्यतेच्या पातळीवर आणले आहे. मत्स्यकन्येची कथा हीसुद्धा अशीच मनाला चटका लावणारी सत्यकथा आहे. लेखकाने जणू या कथेद्वारे मानवी मनाला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे. निबंध वाचताना आपण कधी पऱ्याचा परिसरात जाऊन पोहचतो हे आपल्याला समजत नाही. लेखकाच्या वर्णनशैलीचे हेच यश आहे.

## १९. सांबराचे लोटण

या निबंधात चितमपल्लींनी सांबराचे जीवन चित्रित केलेल आहे. सांबराचे प्रकार त्याच्या नावाची ओळख, आदिवासींमध्ये असणारे सांबराविषयीचे समज, सांबराची शत्रूपासून संरक्षण करण्याची पद्धती, लोटण, घासणं, टवसणं, सांबराची भक्ष शोधण्याची पद्धती हे सारं एकवटून या निबंधात आलेले आहे. दादा गोरे यांचे मते, "पऱ्यांचा परीसर या लेखाप्रमाणेच सांबराणे लोटण याही लेखात चिंतमपल्लींनी सृष्टीतील अद्‌भूततेची उकल केली आहे."[३२]

या निबंधातून सांबर या प्राण्याविषयी सविस्तर माहिती मिळते शिवाय जंगलातील घडामोडींची महिती मिळते. उदा :– सांबराचा प्रकार एकच आहे. पण त्यातील नर मात्र कुसऱ्या ढाक, जिऱ्या ढाक व खेकस ढाक अशा तीन प्रकारानी ओळखला जातो. आदिवांसींमुळे या नराला 'ढाक' हे नाव पडले जंगलातील आदिवासी

आणि शिकारी सांगतात, जंगलात 'ढाक' असा आवाज पुन्हा पुन्हा येवू लागतो तेव्हा निश्चित समजावे की, जवळपास वाघ फिरतोय यावरून असे दिसून येते की, अनेक वन्य प्राण्यांची नावे ही अशी आदिवासींमुळे पडलेली आहेत. तर या निबंधात सांबराच्या लोटणाबद्दल दुर्गाबाई भागवत यांच्या 'भावमुद्रा' या ललित संग्रहातील लोकगीताचाही संदर्भ येतो.

उदाः— "मलेवा पहाडतोने उतरथ है पानी
कैतेको ठमकत रेंगवें उतरे बानी
मलेवा तो पहाड मे गजब सांभरके पाटन
और तैं हावस रैमालिन गजबके चाटन."

या लोकगीतातून आपल्याला लोटण, चाटन याबद्दल माहिती मिळते 'पाटण म्हणजेच लोटण.' रैमालिन तिथे चाटन म्हणजे खाऱ्या मातीची जागा. चितमपल्लींनी असे संदर्भ देऊन जंगलातील घडामोडींची ओळख पटवून दिली आहे त्यामुळे हा निबंध भारदस्त बनतो. चितमपल्लींनी या निबंधात अद्भूत अशी एक कथा सागितली आहे, चुटियाच्या जंगलात भूत्याचे लोटण आहे. माधवराव पाटील तिथे एकदा शिकारीला गेले असता त्यांना एक भयानक अनुभव आला. पाटलांना असे वाटले की, तिथले जंगल त्यांना बोलवत आहे. तू येथे ये, तू येथे ये! असा विचित्र आवाज त्यांना ऐकू आला त्यामुळे पाटील घाबरले या परिस्थितीचा परिणाम त्यांच्या मनावर आणि शरीरावर झाला त्यामुळेच माधवराव पाटील सहा वर्षे अंथरुणालाच खिळून राहिले. यावरून असे वाटते की, मानवाच्या मनातील भीती ही सर्वात वाईट असते. भीतीमुळे त्याचे वाईट परिणाम होतात. एकदा धैर्य खचले की, माणूस पूर्णपणे गळून जातो, काही वेळेस त्यात त्याचा अंतही होऊ शकतो. माधवराव पाटील हे धैर्यशील होते त्यामुळे ते या प्रसंगातून वाचले. या निबंधात चितमपल्लींनी जंगलातील अशा अद्भूत घटनांची उकल केली आहे.

## २०. टेकराज

या लघुनिबंधामध्ये चितमपल्लींनी शास्त्रीय माहितीचे संदर्भ देऊन 'टेकराज' चे रहस्य उलघडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर रातवा पक्षाच्या ओरडण्याचे

रहस्य आणि वारुळाची ओळख करून दिलेली आहे. मामा बरोबर वारुळे शोधताना चितमपल्लींना एकदा एक पाखरू उडताना दिसले. लेखकाने मामाकडून त्या पाखराच्या ओरडण्याचे रहस्य जाणून घेतलं ते असं की, देवानं त्या पाखराला स्वर्गातून घोडं आणायला सांगितलं तर गडी रिकाम्या हातानं परत आला. देवानं त्याला झापलं तू पाखरू होऊन रातभर घोडं हाकशील तेव्हापासून ते पाखरू रातभर चुकचुक आवाज करीत घोडं हाकतं म्हणून त्या पाखराला रातवा म्हणतात यावरून चितमपल्लींच्या संशोधकवृत्तीचा प्रत्यय येतो.

दादा गोरे यांना असे वाटते की, "वारुळाच्या अद्‌भूत कथा चितमपल्ली सांगतात त्यातून 'टेकराज' चे गूढ उकलत जाते, परंतु हे गूढं उकलण्यासाठी जो अभ्यास लागतो, जी चिकाटी लागते त्याचा प्रत्यय हे गूढ लेख वाचताना सतत येतो. मामानी करून दिलेली 'टेकराज'ची ओळख जितकी अद्‌भूत तितकेच मारुती चितमपल्लींचे निरीक्षर्ण सूक्ष्म अद्‌भूत गूढ आणि तितकेच ललितरम्य आहे."[३३] दादा गोरे यांचे म्हणणे चितमपल्लींच्या लेखनाला शब्दशः लागू पडते. कोणतेही गूढ उकलण्याचा प्रयत्न चितमपल्ली चिकाटीने करतात. उदाः– 'टेकराज' पाहण्यासाठी लेखक त्यांच्या मामाबरोबर वारुळे खोदत होते. लेखक टेकराजचें वर्णन करतो काळ्या मुलायम मातीत थंडगार प्रकाशाचा पांढरा आकारहीन लिबलिबित गोळा दिसत होता. तोंड लाल लाल होते- इथे लेखकाची भाषाशैली प्रभावी ठरते. टेकराजचे वर्णन लेखकाने नाजूक शब्दात आणि हळूवार भाषाशैलीत केलेले आहे. यावरून चितमपल्लींच्या आकर्षक भाषाशैलीचा प्रत्यय येतो. टेकराजचे आणखी एक रहस्य अस आहे की, टेकराज सहसा कुणला पचत नाही परंतु ज्याला पचतो त्याला अजर काया मिळते. लेखकाचे मामा हा टेकराज खातात त्यामुळेच त्यांना अजर काया मिळाली चितमपल्ली स्वतः सांगतात, "मामा नायचाकूरला राहतोय त्याच वय ऐंशी वर्षाहून अधिक आहे मामा अजूनही सुदृढ आणि निरोगी दिसतो."[३४] मामा आपल्या निरोगी शरीरयष्टीचे श्रेय टेकराजलाच देतात.

'टेकराज' बद्दल शास्त्रीय माहिती ही आधार म्हणून दिलेली आहे. अलीकडे वारुळाबाबत झालेल्या संशोधनावरुन सिद्ध झाले आहे की, वारुळं ही दुसऱ्या ग्रहावरून आलेली आहेत. दीर्घायुष्य मिळालेले साप व घोरपडी यांची वीण त्यात होते वन्यजीवांना

त्यापासून कोणतीही इजा होत नाही यावरून असे जाणवते की चितमपल्लींनी अशा शास्त्रीय माहितीचा आधार दिल्याने वारुळाबद्दलचे वाचकाचे ज्ञान अधिक स्पष्ट होते. नंतर 'मेघदूत'मध्ये वारुळाचा उल्लेख आहे त्याचाही संदर्भ दिलेला आहे. 'वाल्याचा वाल्मिकी ऋषी झाला' तो या वारुळातच. वाल्या कोळी तपश्चर्येला बसल्यानंतर अनेक वर्षांनी त्याच्यावर वारुळ तयार झालं तिथंच त्याला दिव्यशक्ती प्राप्त होऊन तो दिव्यऋषी झाला. यावरून अशी अनुभूती येते की, मानवाला दिव्य ज्ञान प्राप्त करण्याचे सामर्थ्य वारुळात आहे. अशी ही कथा आहे. जंगलातील वारुळे पाहिली की, लेखकाला इजिप्तमधील पिरॅमिडची आठवण होते कारण पिरॅमिडमध्ये विशिष्ट भागात दमट हवा असते. त्यात मृत प्राणी न सापडता मसाला भरुन ठेवलेल्या ममीप्रमाणे सुकलेले दिसतात. चितमपल्लींना मॅक्सिको मधले पिरॅमिड आणि वारुळे यांच्या गुणधर्मात साम्य दिसले. परंतु याचा अजून तरी शास्त्रोक्त अभ्यास झालेला नाही, याची त्यांना खंत वाटते. असा अभ्यास होणे गरजेचे आहे.

निसर्गातील सत्य शोधण्यासाठी चितमपल्लींनी शास्त्रीय माहितीचे संदर्भ दिलेले आहेत. ते संदर्भ या निबंधात यथोचित आहेत. शिवाय ललितरम्य भाषेत लेखन केल्याने हा लेख वाचकाचे लक्ष वेधून घेतो. 'टेकराज'बद्दलची उत्सुकता वाढते व आपल्या ज्ञानात भर पडते. हा या निबंधाचा विशेष म्हणावा लागेल.

## २१. कथा सापाच्या आवाजाची

या निबंधात लेखकाने अतिशय सुंदर असे सापाचे वर्णन केले आहे. त्याच्या चालण्यातल्या, सरपटण्याच्या गतीतसुद्धा तेजस्वी सौंदर्य आहे. कुठेही हिसका नाही. पाण्यातील माशाला गतीतली विविधता नाही. डौलदार वळण, सुबक आकार, रमणीय सौंदर्य, तेजस्वी डोळ्यातील भेदकता, अन्नावाचून दिर्घकाळ राहणारा असा हा प्राणी आहे. सापामध्ये जी काही रहस्ये दडली आहेत लेखकाने याची उकल केली आहे. अशी अनेक गूढे असलेला साप आजच्या विज्ञान युगात जिज्ञासेचा विषय वाटतो. सर्वजीवांमध्ये फक्त सापालाच तारुण्याचे वरदान मिळालेले आहे. त्याचबरोबर सर्वच साप विषारी नसतात. सापाच्या अलौकिक गुणधर्मामुळे आदिमानवाने त्याला देवळात बसवून देव मानले. सापाविषयी आपल्या मनात भीतीही असते आणि श्रद्धाही असते. मानवाच्या मनातील हे गूढ सत्य आहे. चितमपल्लींनी

अभ्यासपूर्ण असे संदर्भ या निबंधात दिलेले आहेत. उदाः— चरक सुश्रुत व वाग्भट संहिता या वैद्यकीय ग्रंथात सापाचे प्रकार सांगून सर्पदंशावर उपाय सांगितलेले आहेत. तसेच 'विषाची परीक्षा पाहू नये' या म्हणीचाही संदर्भ इथे येतो चितमपल्लीनी महाभारतातील संदर्भाचा आधार घेवून कश्यप ऋषीची ओळख करून दिली आहे. ऋषी कश्यप याने कद्रू व विनता या दोधी बहिणींशी विवाह केला. कद्रूने सर्पांना जन्म दिला तर विनताने गरूडांना जन्म दिला असे हे सापाच्या विणीविषयीचे अभूतपूर्व ज्ञान या निबंधातून मिळते.

सर्वसामान्यांच्या ऐकण्यात नसणारी सापाच्या आवाजातली विविधता चितमपल्लींनी टिपलेली आहे. आधुनिक सर्प तज्ज्ञांचे मत असे आहे की, सापाला स्वर तंतूच नसतात. तर आवाज येणार कुठून ? पण हा भ्रमाचा भोपळा माधराव पाटील आणि निरगू गोड यांनी फोडला. त्या दोघांनी लेखकाला सापाच्या आवाजाची ओळख करुन दिली. माधवराव पाटलांबरोबर तळ्याकाठाने भटकत असताना अचानक कुठूनतरी टर्रर्र असा आवाज येऊ लागला. आभाळातून जाणारे बगळे, ढोकरी क्षणभर उडायचे थांबले. सगळं वातावरण एकदम शांत झाले, तेव्हा माधवराव पाटलांनी लगेच ओळखले हा आवाज टवऱ्या मुहाडोर सापाचा आहे. माधवराव पाटील हे सर्पज्ञानी होते तसेच त्यांनी जंगलात असे आवाज वारंवार ऐकलेले होते त्यामुळे त्यांना त्या आवाजाची ओळख आहे. आणखी एक वेगळे रहस्य लेखकाने उलगडून दाखवले आहे. लाव्हा पक्षी सापाच्या आवाजाला खूप घाबरतात. कारण साप गांजी लावाचा आवाज हुबेहूब काढून त्या पक्षांना जवळ बोलवतो. नजीक येताच तिला दंश करून पकडतो. दादा गोरे म्हणतात, "भरजरी शालूचा एकएक पदर उलगडत जावा तसे चितमपल्लींच्या लेखनातील गूढ उलगडत जाते. त्यांच्या लेखनातून येणारी अद्‌भूतता अनुभवाच्या वास्तवतेवर अवलंबून आहे. कथा सापाच्या आवाजाची हा लेख असाच आहे."[३७] गोरे यांचे मत यथार्थ वाटते कारण सापावषयीच्या अनेक रहस्यांचा उलगडा या निबंधात लेखकाने केलेला आहे. अनेक उदाहरणे संदर्भ देऊन लेखकाने आशयाला बळकटी आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. याशिवाय महत्वाचे म्हणजे हां निबंध शास्त्रशुद्ध माहिती वाचकाला देतो. निसर्ग ज्ञानाबरोबर सर्पज्ञानही वाचकाला प्राप्त होते. त्यामुळे हा निबंध प्रभावी ठरतो.

## २२. झाडावर चढणारे कासव

आपण सर्वजण पाण्यातील कासव पाहतो. झाडावर चढणारे कासव सहसा आपल्या पाहण्यात नसते. या निबंधामधून आपणास झाडावर चढणाऱ्या कासवाची ओळख करून दिली आहे. शिवाय कासवाच्या विणीसंबंधी वैज्ञानिक माहिती दिलेली आहे. पक्षी निरीक्षण करत असताना चितमपल्लींना झाडावर चढणारे कासव दिसले. थोडयाच दिवसात सारा डोंगर कासवांनी भरून गेला. अशा दुर्मीळ दृश्याची नोंद चितमपल्लींनी या निबंधात केली आहे.

डॉ. सुहास पुजारी यांनी म्हटले आहे, "प्राणीविशेष नेमकेपणाने टिपणे हा एक चितमपल्ली यांच्या लेखनाचा प्रकृतीधर्म आहे."[३५] पुजारी यांचे म्हणणे प्रस्तुत निबधास योग्य असे आहे. चितमपल्ली प्राणीविशेष नेमकेपणाने टिपतात. उदा:– एकदा एक कासव जंगलातील वणव्यात सापडले जंगलातील सगळा पालापाचोळा पेटला लेखकाला वाटले आता ते कासव होरपळून निघणार पण त्या कासवाने ऊब लागताच जागच्या जागी उभे राहून डोके पाय कवचात ओढून घेतले. दिशेने निघून गेले असे हे अग्नीदिव्यातून निघालेल्या कासवाचे दृश्य लेखकाने टिपले आहे. नंतर कासव डोंगरातील जंगलात का येतात ? याचेही रहस्य लेखकाने शोधून काढले. ऐनाडी वृक्षावरील डींक खाण्याकरीता ती कासवं झाडावर चढतात या कासवांना चितमपल्ली कवच ल्यालेले उन्हाळी पाहुणे म्हणतात. चितमपल्ली निसर्गातील प्रत्येक घटकाला मानवी रूपात पाहतात. याची प्रचिती इथे येते. शिवाय लेखकाची भाषाशैली इथे प्रभावी ठरते. एकदा एका कासवीणीने खड्डा भरून अंडी घातली. तिच्या चेहऱ्यावरचे आनंदी भाव पाहून लेखकाने तिच्या या महत्कृत्याबद्दल मनोमन आभार मानले यावरून चितमपल्लींच्या मनातील प्राण्यांविषीचा आदरभाव व प्रेम व्यक्त होते. नंतर माधवराव पाटील आणि चितमपल्लींनी काही अंडी पाटलांच्या वाड्यात पुरली आठ–नऊ महिन्यांनी प्रयोगादाखल एक अंड बाहेर काढून फोडलं असता त्यातून लिबलिबीत असा मासाचा गोळा बाहेर पडला. तो गोळा एक दोन दिवस पाण्यात ठेवल्यानंतर त्याला कासवाचा आकार आला. चितमपल्लींनी निसर्गातील घटकाची ओळख प्रयोगाने सिद्ध करून दिली आहे. यावरुन चितमपल्लींचा प्राणीशास्त्राचा अभ्यास दिसून येतो याशिवाय निलगायी कासव खाते हे आश्चर्यकारक सत्य लेखकाने इथे नमूद केले आहे. यावरून अशी अनुभूती

येते की, निसर्गातील दुर्मीळ असे प्रसंग चितमपल्ली अचूकपणे टिपतात. या निबंधात ललित लेखनाला शास्त्रीय माहितीचा आधार दिल्याने निबंध चितमपल्लींच्या लेखनातील वेगळेपण स्पष्ट करतो.

## २३. चांदमारी

या निबंधात चितमपल्लींनी जंगलातील अद्‌भूत घडामोडींवर प्रकाश टाकलेला आहे रामपुरीपासून जाणारा एक फाटा मामाभाचा रस्ता म्हणून ओळखला जातो. मामाभाचा या नावाचे रहस्य चितमपल्लींनी सांगितले आहे. फाट्याच्या सुरवातीला रस्त्याच्या कडेला सागाचे दोन विशालवृक्ष शेजारी शेजारी उभे आहेत त्या दोन वृक्षांकडे पाहून आदिवासींना वाटते जंगलातल्या आदिम वाटेनं भाचा आपल्या मामाबरोबर चालला त्यावरून असे वाटते की, वृक्षांमधली नाती आदिवासींना उमगतात. आदिवासी, वृक्षांना आपल्यातलेच एक आहेत असे समजतात. त्यामुळेच ही माणसं वृक्षांना सोबत करून राहतात.

दादा गोरे यांना असे वाटते की, ''जंगलाचं देणं, मधील 'चांदमारी' हा लेख अद्‌भूत कथेच्या पातळीवर उतरतो.''[३७] या निबंधामध्ये जंगलातील अद्‌भूत घटनांचा उल्लेख येतो. माधवराव पाटलांनी चितमपल्लींना भुताईच्या लोटणावर घडलेल्या चितर कथा सांगितल्या आहे. माधवराव पाटलांच्या घरी हगरु ढिवर राहत होता रायफल बंदुक ~~चालवण्यात त्याचाही नेम~~ पक्का होता. एकदा त्याने भुताईतल्या लोटणावरच्या सांबरावर गोळी घातली परंतु रक्त मात्र हगरु ढिवराच्या अंगातून वाहत होतं त्यानं स्वतःच्या अंगाकडं पाहिलं आणि तो तिथंच कोसळला घरी आणल्यानंतर एक–दोन दिवसांनी त्याचा मृत्यु झाला यावरून असे प्रत्यंतर येते की, भितीने माणसाचा मृत्युहीं होऊ शकतो. ढिवराच्या श्रद्धाळू मनानं धसका घेतला आणि त्यातच त्याचा अंत झाला. चितमपल्लींच्या लेखातील असे प्रसंग वाचून जंगलातील अद्‌भूततेची जाणीव होते. नंतर जणू आवारीनं शे–पन्नास गडी गोळा करून भुताईच्या लोटणावील सांबराला उचलून गावात आणले ते सांबर पाहिलं तेव्हा बाबाजीचा जीव भांड्यात पडला. जीव भांडयात पडणे हा वाक्प्रचार येथे आला आहे. या सरण्यावर पुन्हा कोणीही शिकार केली नाही. हा सरणा 'चांदमारीचा सरणा' म्हणून ओळखला जातो.

माधवराव पाटलांनी सांगितलेल्या या कथेवरुन चितमपल्लींना 'चांदमारी' हे शीर्षक सुचले. हे नाव त्यांना कौतुकास्पद वाटले. सुंदरता आणि मरणाचं इतकं समिश्र नाव ऐकून चितमपल्ली भारावून जातात. या नावातील गूढ त्यांनी उकलून दाखविलं आहे. यावरून चितमपल्लींच्या लेखाच्या शीर्षकाची सार्थकता पटते.

## २४. नक्षत्राचं देणं

अभ्यासू वृत्तीने आणि चिंतनाने चिंतमपल्लींनी हा निबंध लिहिला आहे. दादा गारे यांचे मत असे आहे की, "नक्षत्राचं देणे या ललित लेखनात मारुती चितमपल्लीचे चिंतन आलेले आहे."[३८] दादा याचें याचे मत यथायोग्य आहे चितमपल्लींनी प्रत्येक निबंध हा चिंतनशीलतेने लिहिलेला आहे. निरगू गोंड या आदिवासींकडून लेखकाला नक्षत्राबद्दल भरपूर असे ज्ञान मिळाले. नक्षात्राच्या आवाजाचे मूळ आदिवासींमध्ये आहे आदिवासी आणि कुत्र्यांना तो नक्षत्राकडून मिळालेला आहे. सर्वसामान्यांच्या अनुभव कक्षेत नसणारे असे ज्ञान चितमपल्लींच्या लेखनातून वाचकांना मिळते. चितमपल्ली रात्ररात्र आदिवासींबरोबर बोलत बसायचे आणि त्यातून त्यांना जे ज्ञान मिळत गेले तेच ज्ञान चितमपलींनी वाचकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आवारी गुरुजींनी चितमपल्लींना नक्षत्राच्या नावाची ओळख करून दिली उदाः– आर्द्रा नक्षत्राला आदिवासी आडदरा म्हणतात कारण उन्हाळयात दिसणाऱ्या दऱ्या पावसाळ्यात मात्र नजरेआड होतात. जिकडेतिकडे हिरवेगार होते. दऱ्याखोरी हिरवळीचा आल्हाददायक आकार घेऊन उभ्या राहतात. यावरून आदिवासींकडून या नक्षत्राला आर्द्रा हे नाव पडलं त्यानंतर स्वाती नक्षत्राबद्दल एक अशी कथा आहे. दमणा नदी किनाऱ्यावरील वाळूत शिंपला व शिंपी दिसू लागतात. या दोन्हीमध्ये जीव असतो अचानक पावसाचे थेंब पडतात. त्यावेळी तया शिंपल्याचे तोंड उघडले जाते आणि त्यात पावसाचे थेंब पडून त्याचा मोती होतो. देव आपल्या हातांनी एखाद्याच आणि फक्त शिंपल्यात मोती निर्माण करतो. या निबंधामध्ये चितमपल्लींनी नक्षत्राविषयी असणाऱ्या कथा लोकसमज आदिवासींकडून मिळालेली माहिती यासर्वांची अभ्यासपूर्ण नोंद घेतलेली आहे. या निबंधात आदिवासी बोलीतले बरेचसे शब्द आलेले आहेत. उदाः– राजकुंवर, राजपुत्र, कुलीम, शेती, कुंवरांना, मुलाबाळांना इ.

याशिवाय ग्रंथात आढहून येणार नाही अस ज्ञान चितमपल्लींना आदिवासींकडून मिळालं याचबरोबर आदिवासींमध्ये असणारे काही लोकसमज लोककथा त्यांची बोलीभाषा, त्यांच्यामध्ये असणाऱ्या श्रद्धा, त्यांच्या रूढी परंपरा, त्यांचे वृक्षाबद्दचे प्रेम, निसर्गातील घडामोंडींवरचा त्यांचा विश्वास इ. चे दर्शन या निबंधातून घडते त्यामुळे हा निबध वाचनीय वाटतो.

## २७. दिवा आणि दिवारु

दिवा आणि दिवारु या निबंधामध्ये बालपणापासून चितमपल्ली कसे घडत गेले त्यांच्या जीवनाचा विकास कसा होत गेला याचे वर्णन आलेले आहे. त्यामुळे असे वाढते की, हा निबंध चितमपल्लींचे सारे जीवनचरित्र विलक्षण ताकतीने आपल्यासमोर मांडतो. चितमपल्लींच्या आईने त्यांना त्यांच्या जन्माची कथा सांगितली. त्याचा उल्लेख लेखकाने या निबंधात केला आहे. यावरून असे वाटते की, चितमपल्लींचा जन्म उघड्या रानात झाला हा एक योगायोग होता. आणि बालपणापासूनच लेखकाच्या मनात निसर्गाविषयी जिव्हाळा निर्माण झाला.

दादा गोरे म्हणतात, "दिवा आणि दिवारु हा लेख त्यांच्या चरित्राशी बालपणाशी निगडित आहे. त्यात मारुती चितमपल्लींचे आजचे व्यक्तिमत्व कसे आहे याच्या विकासाच्या खुणा दिसतात."[३४] बालपणीची चितमपल्लींच्या घरात गुप्तधनाचा हंडा होता त्या धनावर मोठा असा काळसर्प होता. एक दिवस चितमपल्ली झोपेत असताना त्यांच्या अंगावरून जो साप चालला होता. लेखकाच्या आईने पाहिले आणि त्यानी ते घरच सोडले धनाची अपेक्षा न ठेवता सरळ मार्गने ते घर सोडून टाकले. शिवाय आईने चितमपल्लींना सांगितले बेटा ते धन मिळवलं असतं तर आपण पापाच्या धनाचे वाटेकरी झालो असतो. लेखकाच्या आईचे हे विचार पाहून श्यामच्या आईसारखी एक आदर्श माता आपल्या नजरेसमोर येते आणि अशी अनुभूती येते की, चितमपल्लींच्या जीवनाचा पिंड घडविण्यात त्यांच्या आई वडीलांचा सिंहाचा वाटा आहे. घरातील चांगल्या संस्कारामुळेच चितमपल्लींचे जीवन समृद्ध होत गेले. चितमपल्लींना दिव्याचं आकर्षण वाटतं. दिव्याच्या ज्योतीचे सौंदर्य पाहून लेखकाचे मन हरपून जाते. दिवा आणि सौंदर्याचा संबंध पटवून देण्यासाठी चितमपल्ली शेक्सपियरच्या 'ऑथेल्ला' नाटकाचा संदर्भ देतात. डेस्डिमोनाचा जीव घेण्यासाठी तिच्याजवळ

तो तरुण आला होता, परंतु दिव्याच्या प्रकाशात दिसणाऱ्या तिच्या त्या सौंदर्याकडे पाहून त्याच्या मनाचे परिवर्तन होते. त्याला पश्चाताप होतो यावरून असे दिसून येते की, जीवनाची ज्योत ही एकदा विझली की, ती कायमची विझते. पुन्हा तिचा प्रकाश दिसत नाही. यातून चितमपल्लींनी दिवा आणि सौंदर्य याचा अनुबंध वर्णिला आहे. शुभंकरोति कल्याणम् या प्रार्थनेने दुष्ट बुद्धी नष्ट होते आणि तमसो मा ज्योतिर्गमय असा अज्ञानाकडून ज्ञानाकडे जण्याचा मार्ग सापडतो हेच इथे चितमपल्लींने दाखवून दिले आहे. या निबंधात कंचनी वेश्येची कथा चितमपल्लींनी वर्णलेली आहे. आज कंचनी वेश्येचा महाल ही एक उद्ध्वस्त वास्तु आहे. लोणार देवीपुढचा कदवा याच महालातून पाहण्याचा कंचनीचा पण होता एके दिवशी तो महाल कोसळला आणि कंचनी शीळा होऊन पडली सारे जग पैश्याच्या मागे धवत असताना कंचनीने दिव्याचा ध्यास घेतला आणि त्यातच तिचा अंत झाला. ही कथा मनाला चटका लावते. त्यामुळे हा निबंध वाचनीय वाटतो.

## २६. उदकाचे देणे

उदक (पाणी) म्हणजे निसर्गाची अनमोल देणगी आहे. अन्नावाचून आपण अनेक दिवस जगू शकतो. पण पाण्याशिवाय एक दिवसही जगणे कठिण जाते.' 'पाणी म्हणजे जीवन' हे किती सार्थक आहे. याचा प्रचिती या निबंधातून येते.

मानवाच्या आयुष्यात पक्षी कसे महत्वाचे ठरतात याचे एक उत्तम उदाहरण चितमपल्लींनी या निबंधात दिले आहे. 'अरेबियन नाईटस्' या जगप्रसिद्ध बृहद्ग्रंथाचा लेखक रिचर्ड बर्टन अरबस्थानच्या निर्जल वाळवंटातून प्रवास करीत होता. त्याला खूप तहान लागली होती. घशाला कोरड पडली होती इतक्यात त्यला आकाशात पक्ष्यांचा थवा उडताना दिसला ते पक्षी पाण्याकडे चालले होते . तो त्यांच्या पाठीमागे गेला आणि त्याला तळे दिसले यावरून असे दिसून येते की, त्या पक्षांचीच शिकार करुन मानव स्वतःचेच नुकसान करून घेत आहे. या प्रसंगानंतर रिचर्ड बर्टन याने कधीच पक्षांची शिकार केली त्याच्या मनाचे परिवर्तन झाल्याचे दिसून येते. या निबंधातूल सखोल असे ज्ञान वाचकाला मिळते. सुहास पुजारी म्हणतात, "चितमपल्ली यांच्या ललित गद्याचा एक गुण असा की, अरण्यविद्येतून मिळालेली शास्त्रीय माहिती अतिशय लालित्यपूर्ण आणि रुचिर शैलीत येते.

शास्त्रीय ज्ञानाला लालित्याची साथसंगत लाभते. आणि हे ज्ञान ललित रूप धारण करून अवतरते."[४०] यांचे हे म्हणणे या निबंधलेखनात शब्दशः लागू पडते.नाही. पाण्याचा शोध कसा लागला याचे शास्त्रीय दाखले चितमपल्लींनी दिले आहेत. उदाः– पाणी वाचणाऱ्यास पानाडी म्हणतात. हा पानाडी उंबर किंवा पिंपळाची दुबेळक्याची फांदी हातात घेऊन पाण्याचा शोध घेतो. अशावेळी हाताचे स्नायू तणावलेले असतात. जिथे पाणी असेल तेथे हा तणाव फांदीत उतरतो आणि फांदीची हालचाल होते. रशियन शास्त्रज्ञांनी, भूगर्भ व भूजलशास्त्रज्ञांनी माणसाचे चार वर्ग केले. यामध्ये काही पुरुषांचा फांदीवर प्रभावच पडत नाही. काहींचा पूर्णपणे प्रभाव पडतो, काही पुरुषांवर फांदी खांदा कमरेपासून प्रभावशिल होते. तर स्त्रियांचा या फांदीवर पुरुषांपेक्ष चाळीस टक्क्यांनी अधिक प्रभाव पडतो. आणखी एक शास्त्रीय आणि महत्वपूर्ण माहिती या निबंधातून मिळते ती अशी की, मानसिक विकृतीनं पछाडलेली माणसं मधमाश्यांच्या अखंड गुणगुणणाऱ्या संगिताने सुधारतात. सांबरशिंगे, हत्ती आणि रानडुकरे हे प्राणी जमिनीतील पाणी शोधून काढतात. औदुंबर आणि पिंपळ याच्या मुळात देखील उदक शोधण्याचे तत्व अस्तित्वात आहे. वरील निबंधावरून असे प्रत्ययास येते की, या निबंधातून शास्त्रोक्त माहिती वाचायला मिळते. चितमपल्लीनी लालित्य आणि शास्त्रीय यांचा सुंदर असा मेळ घालून लेखन केले आहे त्यामुळे या निबंधातून वाचकाला अलौकिक आनंद मिळतो.

## २७. गांधारी तळं

'गांधारी' या नावानेच चितमपल्लींच्या मनात घर केले. या शब्दातील लालित्य लेखकाच्या मनाला भावलं आणि हे लालित्य लेखकाने विविध संदर्भ देऊन उघड करून दाखविले आहे.

गांधारी हे भंडारा जिल्ह्यातील पहिलं तळं आहे असं समजलं जातं. या तळ्यातील गांधारी हे नाव लोकांनी दिलेलं आहे. हजारो तळ्यांना जन्म देणाऱ्या या गांधारी तळ्याला, शंभर पुत्रांना प्रसवाणाऱ्या गांधारीचं जे नाव दिलं आहे ते यथोचित आहे. गांधारी तळ्याचं सौंदर्य चितमपल्लींनी टिपलं आहे. हे तळं प्रकाशाचं ज्योतिर्मय सरोवर आहे. शरद्ऋतू कमळांनी आच्छादिलेले हे तळं अतिशय सुंदर दिसतं, त्या तळयातील

पाण्याचं एक वेगळं रहस्य आहे. या पाण्याचे दोन रंग दिसतात. जलाशयात वाढणाऱ्या हिरव्या वनस्पतीमुळे पाण्यात हिरवाई उतरते. तर गगनसदृश्य नीलवर्ण पाण्यात डोलावताना दिसते. अतिशय समर्पक शब्दात चितमपल्लींनी हे वर्णन केलें आहे. चितमपल्लींच्या 'शैलीचे माधुर्य येथे आपणास पहावयाला मिळते.

गिधाडासारखा दलित प्राणीसुद्धा चितमपल्लींच्या लेखनातून चुकत नाही. डॉ. सुहास पुजारी म्हणतात, "निसर्गानुभवातील गूढरम्यतेला तितक्या हळुवारपणे अभिव्यक्तीच्या पातळीवर गूढतेचा स्पर्श झाल्याने चितमपल्ली यांचे लेखन एखाद्या निरव डोहासारखे अधिक गहिरे होते."[४१] पुजारी यांचे मत चितमपल्लीच्या लेखनाला लागू पडते. हजारो वर्षापासून अरुण बाड्डे या पक्ष्यांना संरक्षण देऊनही गेल्या पावणे दोनशे वर्षापासून नामशेष झाल्याचे पक्षीशास्त्रज्ञ सांगतात. शेकडो वर्षनंतर ते गांधारी तळ्यात चितमपल्लींना पहायला मिळाले, हा एक मोठा योगायोगच होता. यावरून चितमपल्लीच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचा आणि संशोधक वृत्तीचा प्रत्यय येतो.

चित्रकार श्री. ए. ए. आलमेलकरांची रेखाटने चितमपललींच्या साहित्यलेखनाला लाभली आहेत. या निबंधात आलमेलकरांचा उल्लेख चितमपल्लींनी आवर्जून केला असल्याचे दिसून येते. कारण आलमेलकर जेव्हा गिधाड पहाड आणि गांधारी पहाडाचा परिसर पहायला आले तेव्हा त्यांनी इथली शेकडो रेखाटने घेतली. उदा:– पहाटेपूर्वीच्या काळोखात देवभात गोळा करणाऱ्या स्त्रिया, गोंड स्त्री–पुरुष, गांधारी कन्यका इत्यादी असं निसर्गाचं सारं गूढ आलमेलकरांनी आपल्या समर्थ कुंचल्यातून साकार केलं. चितमपल्ली आणि आलमेलकरांनी गांधारी गावात जाऊन तिथल्या धीवरांच्या परिस्थिती पाहिली तेव्हा त्यांना असे दिसून आले की, आज विज्ञानाने एवढी प्रगती केली आहे तरी गांधारी गावातील जल पारध्यांचे जीवन अजूनही जसेच्या तसेच आहे तेव्हा त्यांच्या जीवनात सुधारणा झाली पाहिजे. चितमपल्लींना याची खंत वाटते. गांधारी गावातील जलपारध्यांवर अद्याप तरी कोणी लिहिलेलेल नाही. तेव्हा साहित्यातही या जलपारध्यांच्या जीवनाचा उल्लेख आला पाहिजे. यासाठी चितमपल्लींनी या लघुनिबंधात केला आहे. येथे लेखकाची सामाजिक बांधिलकी दिसून येते प्राचीन परदेशीय आणि लोक साहित्यातील संदर्भ आणि कथा यामुळे हे सर्व लेख फक्त पक्षी, वृक्ष, वेली यांची निरीक्षणे न राहता, त्यांना काव्यात्मरूप, आलेले

दिसते. त्यामुळे हे लेख वाचनीय झालेले आहेत."[४२]

यासर्व निबंधांमधून असे म्हणता येते की, चितमपल्लींनी आपल्या लेखनातून सृष्टीची अनेक रहस्ये उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. सुहास पुजारी म्हणतात, "चितमपल्लींनी वृक्ष–पशू, पक्षी जलाशय व अन्य निसर्ग घटकांची चित्रणे करताना त्यांच्या रूपसौंदर्याबरोबरच त्यांच्या अंतरंगाचे दर्शन घडविलेले आहे."[४३] चितमपल्लीनी आयुष्यभर जो जंगलाचा अभ्यास केला, संशोधन केले चिंतन केले त्यामुळेच लेखकाच्या निबंधाला हे सौंदर्य रूप प्राप्त झाले आहे. भाषेचा यथायोग्य वापर करून त्यांनी या अनुभवाचे प्रकटीकरण केल्याने या निबंधांना वाङ्मयीन महत्व प्राप्त होते.

प्रत्येक निबंध आपल्या आगळ्यावेगळ्या सौंदर्याने नटलेला आहे. ओघवती, प्रासादीक भाषाशैली लोकसाहित्य, विज्ञान इतर भाषांमधील वाङ्मयाचे वाचन व त्यांचे संदर्भ यामुळे लेखनाला भारदस्तपणा तर आलाच आहे. परंतु ललित्य शैलीने त्याला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त झाले आहे.

## २. प्राणीजीवन, पक्षीजीवन, निसर्ग आणि मानवी जीवन :–

जीवन हे जीवनच असते. जीवनाचा संबंध जगण्याशीच असतो, मग ते कोणत्याही जीवाचे जीवन असू देत. प्र. ई. सोनकांबळे म्हणतात, "जीवन या शब्दाचा अर्थ जगण्याशी निगडित असतो. नि त्यासाठी माणसाला जीव जिवाणुला सारखी धडपड नि जिवाचे रान करावे लागते."[४४] चितमपल्लींनी मानव, निसर्ग प्राणी पक्षी समग्र विचार करून सौंदर्य टिपण्याचा अप्रतिम प्रयत्न केला आहे. चितमपल्ली लिहितात की, "वन्य जीवाविषयी जे ज्ञान प्राप्त होते ते निरीक्षण आणि त्यांच्या जीवक्रमाविषयी अनुभव घेतल्यामुळे तसेच जंगलातील अहोरात्र वास्तव्य आणि संवेदनशील मनामुळे मला ते सहज प्राप्त झाले आहे."[४५] यात सागवान झाडाचे जीवनचित्रण चितमपल्लीनी केले आहे. एखाद्या गंभीर स्वभावाचा माणसानं सारं काही हृदयात साठवून ठेवावं तसा हा वृक्ष गंभीर वाटतो. आयुष्याचा सारा इतिवृत्तांत हे वृक्ष सांगतात. जसं काही त्यावर हे सारं रेखलेलंच आहे प्रत्येक जीवाला जगण्यासाठी निसर्गाची गरज असते. सर्व जीवांना जीवदान देणाऱ्या या निसर्गालाही त्याचं

स्वतःच असं जीवन आहे. इतर जीवांप्रमाणे त्यालाही भावना, वेदना, सुख–दुःख, प्रेम, माया, आपुलकी नाती–गोती आहेत. पण हा निसर्ग मुक्तपणे जीवन जगत असतो. आपल्या पूर्वजानी निसर्गाला सोबती मानले. परंतु इथे चितमपल्लींनी तर त्याला आपला नातलग मानले आहे. यावरून अशी अनुभूती येते की, सागवान वृक्ष हा मानवाप्रमाणेच जीवन जगत आहे. चितमपल्लींनी त्याच्या मनाचा आणि अंतर्मनाचाही शोध घेतला एवढेच नव्हेतर त्या वृक्षाचा स्वभाव गंभीर असं लेखकाला जाणवलं मानवी जीवनासारखा या वृक्षाचा जीवनवृत्तांत दिसून येतो.

निसर्ग हा नेहमीच सुंदर असतो. माणूस मात्र असा प्राणी आहे की, तो वाढत्या वयाबरोबर कुरूप दिसू लागतो. एखादा वृक्ष जसा वयानं वाढतो तसतस त्याच्या बुंध्याचं, फांद्याचं, पानाफुलांचं सौंदर्य खुलत असतं. अनेक पाखरांना तो आश्रय देतो. अनेक मानव आणि निसर्गाच्या सौंदर्यातला फरक वर्णिलेला आहे. काही मानव आणि निसर्गाच्या भावभावनांमध्येमध्ये जरी साम्य असले तरी काही बाबींमध्ये विविधताही आढळते. मानव हा प्राणी जातीयता आणि समाज या बंधनात बांधला गेलेला आहे. कोणतीही गोष्ट, कोणतेही कृत्य करताना त्याला प्रथम समाजाचा विचार करावा लागतो. आपण जे करतो ते या समाजाला पटेल का ? या विचाराने मानव मुक्तपणे जगू शकत नाही, परंतु पक्षी प्राणी यांना कुणाचेही बंधन नसते म्हणून ते मुक्तपणे जीवन जगत असतात. आज आपण पाहतोय. शहरी जीवनात माणूस किती सुखी आहे ? रोजच्या रोज हजारो प्रश्नानां तोंड द्यावे लागत आहे कधी राहण्याचा प्रश्न ? कधी खाण्याचा प्रश्न ? कधी पाण्याचा प्रश्न ? तर कधी जीवनच प्रश्न बनून मानवाच्या समोर उभे राहते ? अशा परिस्थितीत मानव सध्या जगत आहे. पैसा हाच सर्वस्व आहे असे मानत मानव आलेला आहे. किती मिळाले तरी मानवाची आशा वाढतच राहते यामुळे माणसामाणसांमध्ये भांडणं होत आहेत. सख्खा भाऊ वैरी बनत आहे. संपत्तीसाठी स्वतःच्या बापाचाही खून करणारी माणसे इथं आहेत. परतु प्राणी किंवा पक्षाने पैशासाठी कुणाचा खेन केल्याचे कधी ऐकायला मिळत नाही. कारण पक्षी, प्राणी हे पैसे मिळवण्यासाठी धडपडत नसतात. अशी धडपड फक्त मानवामध्येच असते. प्राणी पक्षी आपल्या वाट्याला आलेले जीवन आनंदाने, निस्वार्थीपणे जगत असतात. पोटाला मिळण्यासाठी रोजच्या रोज धडपड चाराचुरा गोळा करणे एवढचं त्याचा जीवन जगण्याचा उद्‌देश

असतो. कदाचित 'जीवन हे क्षणभंगुर आहे, हे या पक्षी, प्राणी, आणि निसर्गाला माहिती असावे परतु पैश्याच्या जगतात वावरणाऱ्या मानवाला अजून हे ज्ञान झालेले दिसत नाही.

डॉ. सुहास पुजारी यांच्या मते, "चितमपल्ली पक्षी जगत केवळ डोळ्याने न्याहाळत नाहीत तर ते सर्वांगाने न्याहाळतात. आणि हळुवार अतःकरणाने आकाशातले हे वैभव कागदावर उतरवतात त्यामुळे वाङ्‌मयीनदृष्ट्या हे पक्षी उंचावर पोहोचतात."[४६]
उदाः— नवेगाव तळ्यात राहणाऱ्या टिबुकली या पक्षाच्या जोडीची कथा रंगविताना, लेखक चितमपल्लींनी त्या पक्ष्यांचं सारं जीवन चित्रीत केलं आहे. नंतर कावळा हा पक्षी आपल्या काव काव अशा आवाजाने वातावरणात एक प्रकारचा हलकल्लोळ माजवितो. पक्ष्याच्या जीवनावरील आत्यंतिक प्रेमाचे प्रतीक म्हणजे या पक्ष्यांची घरटी प्राचीन साहित्यात पक्षी प्राण्यांच्या घरट्यांविषयी जे उल्लेख आले आहेत. त्याचे संदर्भ देऊन चितमपल्लींनी या घरट्यांचे सौंदर्य लिहून ठेवले आहे. मानवी जीवन जगत असताना मानव एवढ्या उंचउच इंमारती बांधत आहे की, आपल्या सर्वांचं अगदी सहजसुद्धा लक्ष जातं पण या चिमुकल्या पशुपक्ष्यांचे प्राण्यांचे जग, जीवन , संसार कुणी पाहिलाय का? त्यांचं जीवन जवळून न्याहाळलं ते चितमपल्लींनी. मानवाप्रमाणे गरींब—श्रीमंत, काळा—गरीब, जात—धर्म असले भेदभाव या मुक्या जीवांच्या मनामध्ये कधीच येत नाहीत. अगदी सरळ भावनेने ते जगत असतात. साऱ्या जीवनाचं समाधान त्यांना त्या घरट्यात मिळतं. चितमपल्ली लिहितात, "तुषाराच्छादी पर्वतावरील सहा—सात पांडुरकी घरकुली शिलाखंडावरील एखाद्या पक्ष्याच्या घरट्यासारखी रमणीय दिसतात. तर कच्छच्या रणातील राहित पक्ष्याच्या खोपी आकाशातील कुणा एखाद्या गंधर्व नगरीची आठवण करुन देतात."[४७] काही पक्षी आणि प्राणी अपवाद वगळता सर्वच पशुपक्षी कलाकुसरतेनं घरटी तयार करतात. भट तितिराचा थवा आपल्या छातीच्या पिसात पिलांसाठी पाणी साठवून वैराण वालुकामय प्रदेशातून शेकडो मैल उडत घरट्याकडे जातो. लहान मुले जशी आईवडील बाहेर गेल्यानंतर त्यांच्या येण्याची वाट पाहत असतात. ती आल्यावर आपल्या मुलांसाठी काहीतरी खाऊ घेऊन येतात. त्याप्रमाणे घरटयातील पक्ष्यांची पिले चारा घेऊन येणाऱ्या मातापित्यांची आतुरतेने वाट पाहत असतात. पक्षी, प्राणी सकाळी लवकर जागे होतात. आपल्या किलबिलाटाने माणसांनाही जागे करतात

आकाशातून किर् किर् किर् करीत जाणारा राव्यांचा थवा, भारतद्वाजाचे बुगू बुगू, बुलबुलांची गोड किल किल, मैनेचा कलकलाट, नाचऱ्याची चिर् चिर्, सुंदर मनोलीची गोड चिव चिव, एवढेच नव्हे तर अगदी पहाटे उठणारा कावळा. पहाटे त्याचा कोल्हाळ ऐकून असं वाटतं की, जणू तो सांगत आहे– उठा, आता सूर्योदय होण्याअगोदर तुम्ही सगळेजण जागे व्हा. असे हे जीवनातील सारे गूढ पक्ष्यांमध्ये आहे, ईश्वर जसा चराचरात व्यापून राहिला आहे तसे हे पक्षी सर्वत्र व्यापून राहिले आहेत. त्यांच्याशिवाय जगाच्या अस्तित्वाला कसलीही किंमत नाही. असं हे पक्ष्यांचं निरागस जीवन चितमपल्लींनी शब्दबद्ध केलं आहे. चितमपल्ली लिहितात, "माणसं जशी आपली घरं बांधतात. तशीच पाखरंही रात्रीच्या आसऱ्यासाठी घरटी बांधतात. माणसांप्रमाणं पक्ष्यांना आपल्या घरट्याबद्दल मोह असत नाही."[४८]

शत्रूची भीती ही प्रत्येक जीवाला असते. प्रत्येक जीव हा दुसऱ्या जीवावर अवलंबून आहे. हा निसर्गाचा नियम आहे. 'जीवो–जीवस्य–जीवनम्।' याप्रमाणे प्रत्येक जीव दुसऱ्या जीवाला खायला टपलेला आहे. प्रत्येक जीवाला शत्रूपासून सावध राहायला लागते. निसर्गालाही याची काळजी असतेच. माणसांमध्ये जे वैर असतें ते प्राणी पक्ष्यांमध्ये नसते. तरीही त्यांना शत्रूपासून सावध राहायला लागतं. त्यामुळेच तर पाणपिपुलीचा नर झिलानीवर घिरट्या घालणाऱ्या ससाण्याला पाहून आपल्या पिलांना घेऊन उडून जातो.

दुर्गा भागवत लिहितात की, "माणूस आणि भोवतालची मुकी सृष्टी म्हटली तरी त्या दोघांचा जीवशास्त्राच्या दृष्टीनेही काही मेळ आहेच ना? भौतिक नियती विशेषसा फरक ठेवीत नाही. जीवनाचा कायदा एकच. सृष्टीलाच आम्ही निसर्ग असे सुटसुटीत नाव देतो."[४९] दुर्गाबाई भागवत यांच्या मतानुसार विचार केला तर चितमपल्लींनी साऱ्या सृष्टीच्या जीवनाचा विचार केल्याचे जाणवते. थोर समीक्षालेखक वा. भा. पाठक यांच्या मते, "निसर्गाकरिता मानव नसून मानवाकरिता निसर्ग आहे. निसर्ग–स्वभाव, निसर्ग–शक्ती, निसर्गात जे जे आहे ते सारे मानवातही आणखी अधिक त्याहून आहे."[५०] पाठक यांचे म्हणणे यथार्थ वाटते. मानव, प्राणी व पक्षी या सर्वांचा जीवन जगण्याचा आटापिटा दिवसभर चालू असतो. रात्र होताच सर्व जीव शांत झोपी जातात. पुन्हा सकाळ होताच सर्वजण आपापल्या कामाला लागतात. हा निसर्गाचाच नियम आहे. निसर्गातील प्रत्येक घटक हा मानवाच्या आयुष्यात

फायद्याचाच आहे. निसर्ग त्याच्याजवळ जे काही आहे ते आपल्याला भरभरुन देतो हा निसर्गाचा गुणधर्मच आहे.

परोपकाराय फलन्ति वृक्षाः।
परोपकाराय वहन्ति नद्यः।
परोपकाराय दुहन्ति गावः।
परोपकाराय सतां विभूतिः।

छायामन्यस्य कुर्वन्ति
निष्ठन्ति स्वयं आतपे।
फलन्यपि परार्थाय
वृक्षः सत्पुरुषा इव।

निसर्गाची वृत्ती ही अशी परोपकाराची आहे. त्यामुळे वृक्षसुद्धा थोर संतच आहेत. वृक्षांवर प्रेम करणं म्हणजे परमेश्वरावर प्रेम करण्यासारखं आहे.

स्वयं न खादन्ति फलानि वक्षः।

स्वयं प पितान्वि जलानि नद्यः।

झाडे कधी आपली फळं खात नाहीत नद्या कधी स्वतःचं पाणी स्वतः पित नाहीत. अशी ही परोपकाराची शिकवण आपल्याला निसर्गाकडून मिळते.

झाडे, मानव, पक्षी, पशू, प्राणी निसर्गातील वनस्पती, पाने, फुले, नद्या, झरं, पहाड, टेकड्या, वारुळे, मासे इ. चराचर सृष्टीतील सर्वजण परस्परांवर अवलंबून आहेत हे लेखकाने अत्यंत प्रभावीपणे चित्रित केले आहे. निसर्ग–मानव–पशू–पक्ष–प्राणी यांच्यावर नितांत प्रेम असल्यानेच चितमपल्ली समरसून लिहितात. याचा प्रत्यय या लेखनातून येताना दिसतो.

३. वर्णनशैली, भाषाशैली :–

'जंगलाचं देणं' या पुस्तकामध्ये चितमपल्लींनी योजलेली वर्णनशैली पाहण्याअगोदर शैली म्हणजे काय? हे जाणून घेणे आवश्यक वाटते. डॉ. म. मा. आळतेकर लिहितात, "प्रत्येक लेखकाची लेखनात अभिव्यक्त होणारी विशिष्ट वृत्ती त्यालाच आकार किंवा शैली म्हणतात."[९१] साहित्याची भाषा आणि व्यवहाराची भाषा यात फरक असतो. वामन लेले म्हणतात, "आपण सगळेच भाषेचा वापर करतो, तसाच तो प्रतिभावान लेखकही करतो पण ती स्वतःची विशिष्ट उद्दिष्ट्ये साधण्यासाठी भाषेचा वापर करतो. त्याच्या प्रज्ञेचे सारे आविष्कार आणि प्रतिभेचे सारे उन्मेष भाषेच्या द्वारेच व्यक्त होतात."[९२] ललित लेखनातील तपशिलाची प्रत्येक बाब समग्र साहित्यवृत्तीच्या रंगांनी रंगून गेलेली असते. म्हणूनच तर व्यावहारिक भाषेत सामान्य वाटणारी वाक्ये ललित साहित्यात अर्थपूर्ण वाटतात. वामन लेले लिहितात, "ललित लेखक भाषेच्या साह्याने सौंदर्यनिर्मिती करतो. हे कार्य प्रभावीपणे साधण्यासाठी विरामचिन्हे, अपूर्ण, समानान्तर, कमविपर्यास, नकारात्मक इ. विविध वाक्यविन्यास प्रच्छन्न संदर्भोल्लेख, अवतरणे, वाक्प्रचार, म्हणी, उपमाप्रभृती, अलंकार इ. अभिव्यक्ती उपाय चोखंदळपणे वापरतो. त्यामुळे त्याचे लेखन रमणीय व अविस्मरणीय वाटते."[९३] 'जंगलाचं देणं या पुस्तकामधून दिसून येणारी चितमपल्लींची वर्णन शैली आणि भाषाशैली वाङ्मयीन गुणधर्माला साजेशी अशी आहे. चितमपल्लींची भाषाशैली ही त्यांच्या मनातील आशयाला खुलविणारी अशी आहे.

'जंगलाचं देणं' या पुस्तकातील सारेच लेखन आत्मनिवेदन पद्धतीचे असल्याने लेखनात एक प्रकारची सहजता आली आहे. आपल्या अनुभवाच्या प्रकटीकरणासाठी त्यांनी भाषेचा प्रचंड खजिना मोकळा केला आहे. त्यांच्या निवेदनात सुयोग्य असा प्रवाहीपणा आहे. त्यांच्या लेखनशैलीला निसर्गप्रेमाची सुंदर अशी किनार लाभलेली आहे. प्राचीन वाङ्मयातील दाखले आशयाला बळकटी आणताना दिसतात. लेखकाचे प्रचंड वाचन, तीक्ष्ण निरीक्षण शक्ती व समृद्ध अनुभव या तीन पायावर लेखकाच्या लेखनाची इमारत उभारल्याचे जाणवते. प्रतिभेचं देणं लाभलेल्या या लेखकाने वाचकाला मित्र समजून लेखन केले आहे. कुठेही उपदेशाचा आवेश नाही की, ज्ञानाचा अनुभवाचा अहंकार नाही. एक प्रामाणिक प्रांजळ लेखक म्हणून त्यांना ओळखले जाते त्यामागे नेमकी हीच कारणे आहेत. चितमपल्लीची

भाषाशैली ही साधी सरळ अशी आहे. अलंकारापासूनही ती खूप दूर आहे. मुलाखतीमध्ये चितमपल्ली सांगतात की, ''माझ्या साहित्यामध्ये मी अगदी साधी सोपी वाक्ये वापली आहे. सर्वांना समजेल अशी वाक्यरचना केलेली आहे. कुठेही लांबलचक वाक्यांचा पाल्हाळ नाही.''[७४] लेखकाचे हे म्हणणे अगदी बरोबर आहे. त्यांचे साहित्यलेखन वाचून याची प्रतीती येते.

——— —प्रसंगानुरुप अशी भाषा लेखक वापरतो. नितांत सुंदर शब्दचित्रे सर्वत्र विुरलेली आहेत. एखाद्या कुशल चित्रकाराने रंगाच्या माध्यमातून सुरेख असे चित्र काढावे तसे चितमपल्लींनी शब्दाचा वापर केलेला आहे. प्रसंगानुरुप त्यांची भाखा वळण घेते चितमपल्ली लिहितात की, ''मी जंगलातील वाटेनं चालू लागमो. अन् मागून पावसाची साद ऐकू येते. ती साद जवळजवळ येङ लागते. कुठतरी आसऱ्याला जावं म्हणून मी झाडाचा बुंधा शोधीत मागं पाहतं. तो पाऊस नसतोच. सागाच्या जंगलातील झाडाझाडांतून वारा वाहत असतो!''[७५] या परिच्छेदावरुन चितमपल्लीच्या भाषाशैलीचा आणि वर्णनशैलीचा प्रत्यय येते. अगदी साधी आणि छोटी छोटी वाक्ये लेखक वापरतो. पण या वाक्यांमध्ये मोठा आशय दडलेला आहे. अगदी दोन शब्दांची सुद्धा वाक्ये या चितमपल्लींच्या लेखनात आहेत. अशा वाक्यरचनेमुळे त्यांचे लेखन वाचकाच्या मनाला भावते. श्री. रा. ग. वाळींबे म्हणतात, ''शब्द म्हणजे सुवर्णच होय. ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे शब्दात सामावलेलं नयन मनोहर सौंदर्य चातुयर्षने आविष्कृत करणे हेच कलावंताचे खरे कार्य होय.''[७६] हे कार्य चितमपललींनी पार पाडल्याने ते एक सच्च्या कलावंताचे वाटतात. योग्य ठिकाणी योग्य शब्दांचा वापर चितमपल्लींनी केलेला आहे. त्यामुळे भाषेत आणि वर्णनात गोडी जाणवते. याशिवाय लेखनात म्हणी, वाक्प्रचार, लोकसमज, इतर भाषेतील शब्द अर्थासह उपयोजिले असल्याने 'जंगलाचं देणं' या पुस्तकातील लेखन वाङ्मयीन पातळीचा उच्चांक गाठते. उदा:— म्हणी : 'भुताशी लग्न झाले तर चिंचेच्या झाडावर चढावे लागते.' (पृ. १७) लेखक म्हणतो की, ही म्हण तामिळ भाषेतील आहे. पण चितमपल्ली मराठी मध्ये या म्हणीचा संदर्भ देतात. 'जिथं पिकतं तिथं विकत नाही ! (पृ. १३) आपण ही कधी कधी रोजच्या बोलण्यात या म्हणींचा वापर करतो. 'पळसाला पानं तीनच.' (पृ. १९) तिच्या कथेसह याम्हणीचा संदर्भ लेखक देतो. 'मोर शिंगारत राहिला, अन् गोया राजा झाला.' (पृ ८१), वाक्प्रचार :— बळी पडणे, विलक्षण

वाटणे, दाद देणे, पोपटपंची करणे, आलिंगन देणे, अवलोकन करणे, आसरा देणे, निनादित होणे, धूम ठोकणे, गूढ असणे, कालक्रमणा करणे, विचलीत होणे, अंतःकरण व्यथित होणे, अश्रू ढाळणे, पालवी फुटणे, प्रचिती येणे, मागोवा घेणे, उल्हासित करणे. सामासिक शब्द :– निर्जन, अवर्णनीय, गुरंढोरं, शेळ्यामेंढ्या, रात्रंदिवस, रानावनात, पशुपक्षी, संध्याछाया, सुख–दुःख, दशदिशा असे सामासिक शब्दसुद्धा लेखनात आलेले आहेत. इतर भाषेतील शब्दांचा वापर चितमपल्ली किती कौशल्याने करतात. एवढेच नव्हे तर त्याच्या मराठी अर्थासह त्या शब्दांवी ओळख करून देतात. उदाः– 'तामिळ भाषेत जंगलाला खूप सुंदर नाव आहे. 'शोला' म्हणजे सावलीचं जंगल' (पृ. ७) यानंतर आदिवासी आणि ग्रामीण जनमानसामध्ये असणारे काही समज चितमपल्लींच्या लेखनात येतात. टिटवी धोक्याची सूचना देते म्हणून तिला अशुभ मानतात, कावळे अंगणात ओरडू लागले की पाहुणे येतात, साप डूख धरतो, तळ्यात सात आसरा देवी राहतात, चिंचेच्या झाडावर भूत असतं. अशा या समजुती काही माणसांमध्ये अजूनही रूजलेल्या आहेत. चितमपल्ली 'जंगलाचं देणं' या पुस्तकामध्ये कलात्मक पद्धतीने याचा वापर करतात.

चितमपल्लींच्या भाषाशैलीबद्दल रा. ग. जाधव लिहितात, "चितमपल्लींनी निसर्गाचे रेखाटन करताना केवळ शब्दचित्रण न करता ते हृदयापर्यंत पोहोचेल. सामान्यांनाही समजेल अशा भाषेत मांडण्याचं कौशल्य चितमपल्ली यांच्या लेखनीत आहे."[१७] चितमपल्लींनी पशू, पक्षी, आणि प्राण्यांचीही भाषा शब्दबद्ध केली आहे. त्यामुळे त्यांच्या भाषाशैलीमध्ये अधिक आकर्षकता जाणवते. ललितरंगचे लेखक म्हणतात, "चितमपल्लींची भाषा अतिशय सहजसुंदर आहे. हातचे न राखता त्यांनी हे 'जंगलाचं देणं' भरभरून दिलेलं आहे."[१८] चितमपल्लींनी वृक्षांचीही भाषा कळते. त्यामुळे त्याच्या लेखनात सजीव असे निसर्गचित्रण येते डॉ. सुहास पुजारी यांच्या मते, "चितमपल्लींनी केवळ पक्ष्यांचीच भाषा कळते असे नव्हे तर वृक्षांची भाषाही कळते."[१९] पुजारी यांचे मत यथार्थ वाटते. चितमपल्लींच्या चित्रमय अशा भाषाशैलीमुळे त्यांचे वृक्षांवरचे लेख वाचले की, झाडांशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध स्पष्ट होतात. याशिवाय चितमपल्लींनी आदिवासींचा अनुभव अधिक प्रत्ययकारी होण्यासाठी संवादात आदिवासी बोलींचाही कुशलतेने उपयोग करून घेतला आहे. चितमपललींनी योग्य असे नावीन्यपूर्ण शब्द योजिले असल्याने त्यांची वर्णनशैली व भाषाशैली

बहारदार बनते. वाचकाचे मन वेधून घेणारी वेधक अशी ठरते. नितांत सुंदर, रमणीय, भावपूर्ण, ओघवती सुरेख व समृद्ध अशी भाषा लेखकाला एक आगळीच उंची प्राप्ती करून देते.

## ४. वाङ्मयीन मूल्यमापन :–

तसे पाहिले तर चितमपल्ली हे विज्ञान शाखेचे पदवीधर आणि मातृभाषा तेलगू असून चितमपल्लींनी मराठी भाषेत जे एवढे सुंदर लेखन केलें आहे हेच खरं तर मन भरून कौतुक करण्यासारखे आहे. चितमपल्लींनी लिहिलेलं 'जंगलाचं देणं' हे पुस्तक म्हणजे मराठी साहित्याला मिळालेली 'अनमोल देणगी' आहे. कारण नुसतं लिहिलं म्हणजे ते साहित्यात जमा झालं असं होत नाही. वामन लेले म्हणतात, "ललित लेखन ही एक कला आहे"[६०] आणि ही कला सर्वानाच अवगत होते असे नाही. तसे असते तर कुणीही उठून लेखक बनला असता, परंतु साहित्य लेखनामध्ये कलात्मकतेचा वापर केलेला असतो. वाङ्मयीनदृष्ट्या लेखन चांगले कसे ठरते यासाठी वामन लेले म्हणतात, "चांगल्या लिखाणाचा कस ज्या काही गुणांवर घासून ठरविला जातो. त्यात औचित्य, स्पष्टता, अचूकपणा, प्रस्तुतता व स्वाभाविकता यांचा अंतर्भाव होतो. म्हणूचन लेखकाने कसदार ललित वाङ्मयाचे डोळस वाचन, वाङ्मयीन संकेत व परंपरा यांचे ज्ञान, विवेचक लोकव्यवहार, परीक्षण व चोखंदळ सौंदर्याभिरूची त्यांच्या मदतीने उचित **(appropriate/suitable/fit)** व अनुसूचित **(inappropriate/unsutable/unfit)** यांचा विवेक करावयाचा असतो."[६१] चांगल्या ललित गद्यलेखनात चार महत्वाचे घटक असतात. १) शब्द २) वाक्यांगे ३) परिच्छेद ४) प्रकरण हे घटक ज्या साहित्यात नसतात. ते साहित्य गद्यलेखन होऊच शकत नाही. वि. स. खांडेकर लिहितात, "लघुनिबंध हा ललित वाङ्मयाचा अत्यंत आधुनिक असा प्रकार आहे. या नव्या वाङ्मयाची दोन प्रमुख वैशिष्ट्ये बाहेत. स्वैर कल्पनाविलास आणि साध्या विषयातून मोठा आशय शोधून काढण्याची शक्ती!"[६२] हे सगळे वाङ्मयीन गुण चितमपल्लींच्या लेखनाला लागू पडतात. चितमपल्लींच्या साहित्याचे मूल्यमापन करताना एक महत्वाची बाब इथे नमूद करावीशी वाटते चितमपल्लींच्या भाषेवर थोड्याफार प्रमाणत पण 'वऱ्हाडी नागपुरी' भाषेचा प्रभाव पडलेला दिसतो. प्रमाण मराठीत नपु. रूपातील अन्त्य 'ए' च्या जागी वऱ्हाडीत, 'अं' हा स्वर येतो. उदाः– 'सांगितले' ऐवजी 'सांगितलं', 'त्याने' ऐवजी 'त्यानं', 'वाटते' ऐवजी 'वाटतं' असेच शब्द चितमपलल्लींच्या लेखनात आलेले आढळतात.

प्रवीण बर्दापूरकर म्हणतात, "मारुती चितमपल्ली यांनी मराठी साहित्यात रानावनाची हिरवी वाट अनेक ग्रंथातून प्रकट केली. ती अधिकाधिक ठळक आणि लोकप्रियही होत गेली निसर्गातील रहस्ये, सौंदर्य, भीषणता, आणि रूद्रभीषणताही त्यांनी अनुभवली, मात्र हे सर्व त्यांच्या लिखाणातून व्यक्त झाले ते ललित साहित्याच्या वळणाने त्यामुळेच वाचकांनी ते अधिकाधिक भावत गेलं."[६३] आशयाशी एकरूप झालेले संदर्भ चितमपल्लींच्या लेखनात येतात. त्यांच्या या लेखनामध्ये प्रत्येक शब्द दुसऱ्या शब्दाशी संबद्ध ठेवला आहे. लेखकाने स्वतः तर प्रत्येक घटनेचा अनुभव घेतलेलाच आहे. शिवाय यापूर्वी या विषयावर झालेले लेखन म्हणजे प्राचीन ग्रंथांचा संदर्भ घेतलेला आहे. आपल्या पूर्वजांनी याविषयी काय लिहून ठेवले आहे. याचीही त्यांनी जाणीव ठेवून लेखन केले आहे. प्रत्येक लेखात असे संदर्भ देऊन माहिती पटवून दिल्याने अचूकपणा आणि नेमकेपणा त्यांच्या लेखनात जाणवतो. चितमपल्लींनी प्राणी पक्षी, आदिवासी आणि जंगलाविषयी माहिती गोळा केली आहे. प्राचीन ग्रंथ तपासले आहेत. इतर भाषांमध्ये त्यांच्याविषयी माहिती मिळवलेली आहे. अनेक भाषांचा अभ्यास केलेला आहे. लोकगीते लोककथांचा यथोचित वापर करून आपल्या लेखनाला त्यांनी अप्रतिम अशी जोड दिली आहे. आपल्याला जी अनुभूती आली ती वाचकांपर्यंत पोहचवण्यासाठी आवश्यक असणारी लेखनशैली चितमपल्लींनी आत्मसात केल्याचे सर्वत्र जाणवते. प्रत्येक लेखातील शब्दसौदर्य मनास भावते. उदाः-"मेघ गुणगुणताहेत, वारा रूणझुणतो आहे, आणि पाऊस रिमझिमतो आहे." अशी नादमय शब्दरचना पाहून वाचकाला वेगळाच आनंद प्राप्त होतो.

आपल्या लेखनशैलीला चितमपल्लींनी प्रवाहीत ठेवले आहे. रसभंग होईल असे लेखन कोठेच झालेले नाही. उदाः— देवदार वृक्षाचे वर्णन करताना त्यांच्या शैलीने शांत संयमी, रूप धारण केले आहे तर पळस आणि विलो वृक्षांचे वर्णन करताना सौम्य श्रृंगाराचे रूप धारण केले आहे. अभिजात शब्दसौंदर्याची खाण म्हणूनच या लेखनाचे वर्णन करावे लागेल. निसर्ग चित्रणांची तर मालिकाच इथे पाहावयास मिळते. निसर्गातील सौंदर्य नेमकेपणानं टिपणं ही तशी अवघड वाटणारी गोष्ट इथे सहजसाध्य झाली आहे. चितमपल्लींच्या लेखनातील उदात्तता मनाला वेगळ्या विश्वात नेऊन सोडते. चितमपल्लींनी अगदी सहजलेखन केलं आहे, परतु त्यामध्येही वाङ्मयीन सूत्रबद्धता आलेली आहे. त्यांनी जे लेखन केले आहे. ते स्वयंस्फूर्तीने केले आहे.

"आपणास जे जे ठावे, ते ते लोकांस सांगावे

शहाणे करून सोडावे, सकलजन"

ऊर्मीतून त्यांचे लेखन झाले आहे. सरळ आणि सहज भाषा अत्यंत ओघवती असून प्रासादमाधुर्य गुणांनी नटलेले आहे. कोणताही लेख घ्या त्याचा ताजेपणा जाणवल्याशिवाय राहात नाही. अत्यंत तळमळीने जंगलाच्या प्रेमातून उत्कटतेने कागदावर उतरलेले शब्द मनाला निश्चितच स्पर्शून जातात, जागृत करतात. सुटसुटीत अशी लेखांची रचनाा केलेली आहे. चितमपल्लींनी प्रत्येक लेख प्रारंभ, मध्य, शेवट असा पद्धतशीरपणे लिहिलेला आहे उदा:– 'चिंचा आल्यात पाडाला' या लेखात प्रथम लेखकाने झाडाचे वर्णन करून त्या झाडाची ओळख पटवून दिली आहे. नंतर इतर भाषेत त्या वृक्षाला काय काय नावे आहेत ते नमूद केले आहे. जिथे आवश्यक तिथे योग्य असाच संदर्भ वापरला आहे. त्यावरून त्याची उपयुक्तता व आशय मांडलेला आहे आणि शेवटी ही झाडे तोडणे कायद्याने गुन्हा आहे. याचीही वाचकाला जाणीव करून दिलेली आहे.

साधे साधे शब्द स्पष्टपणे मांडल्याने लेखनात स्पष्टता जाणवते – अर्नोल्डच्या मते, "स्पष्टता हे साऱ्या शैलीचेच रहस्य आहे."[६४] कारण लेखक जे लिहितो ते वाचकाना समजणे आवश्यक असते आणि ते साध्य होण्यासाठी प्रथम ते लेखकाला स्वतःला संपूर्णपणे समजलेले असणे आवश्यक आहे. आकलनीय लेखन हे स्पष्ट विचारातून उगम पावते. **(clear writing emanates from clear thinking.)** चितमपल्लींनी आयुष्यभर जंगलांचा अभ्यास केला असल्याने प्रत्येक घटकाचे त्यांना संपूर्ण ज्ञान आहे. त्यामुळे त्यांच्या साऱ्या लेखनात स्पष्टता जाणवते. 'पक्षी निरीक्षणाचे पहिले धडे फुललेला पळस देतो.' हे एक साधं वाक्य आहे पण यामध्ये खूप अर्थ दडलेला आहे, हा पळस स्वतः धडे शिकवित नाही तर, हा पळस फुलांनी गच्च भरला की विविध प्रकारचे पक्षी त्या झाडावर येऊन बसतात. त्या पक्षांचे निरीक्षण करता येते. ही अशी तीन चार वाक्ये, पण त्याचं चितमपल्लीने सुंदर असं साधं सोपं एकच वाक्य केलं आहे. त्याची स्पष्टता लगेच जाणवते. मराठी साहित्यात चितमपल्ली यांचा 'जंगलाचं देणं' हे पुस्तक वाङ्मयीनदृष्ट्या खूप सुंदर आहे. त्याबद्दल मुंबई सकाळने दिलेला अभिप्राय यथायोग्य वाटतो. "चितमपल्लींनी हातचं न राखता हे 'जंगलाचं देणं' भरभरुन दिलं आहे. अंतःकरणात जिव्हाळा असेल, अनुभवात जिवंतपणा

असेल आणि भाषेवर प्रभुत्व असेल तर किती उत्तम 'ललित गद्य' जन्माला येऊ शकतं याची ही एक झलक आहे.''[६७]

'जंगलाचं देणं' या पुस्तकामध्ये आलमेलकर आणि व्यंकटेश माडगूळकर यांची जी रेखाटने आली आहेत. त्या रेखाटनांमुळे पुस्तकांच्या लेखनसौंदर्यात भर पडते. जंगलातील अबोल जीवांना शब्दकळा फोडण्याची प्रेरणा चितमपल्लींना थोर चित्रकार ए. ए. आलमेलकर यांच्याकडून मिळाली. दादा गोरे म्हणतात, ''चितमपल्लींच्या पुस्तकातील चित्रकार आलमेलकर आणि व्यंकटेश माडगूळकर यांची रेखाटने ललित लेखांना साजेशी अशीच आहेत.''[६८] दादा गोरे यांचे म्हणणे यथार्थ आहे. चितमपल्लींच्या लेखनाला, वर्णनशैलीला आतील रेखाटनांमुळे अधिक उठावदारपणा आल्याचे दिसून येते. प्रत्येक लघुनिबंधाचे शीर्षक हे समर्पक असेच आहे. छोटी, छोटी आणि साधी वाक्ये, सुटसुटीत परिच्छेद, शब्दांची मोहकता यामुळे चितमपल्लींचे लेखन उठून दिसते. लेखनातील प्रत्येक प्रसंग मानला-भावतो. निसर्ग निरीक्षण ही एक साधना आहे. या भावनेने चितमपल्लींनी निसर्गाकडे पाहिले. 'जंगलाचं देणं' जेवढं म्हणून स्वीकारता येईल तेवढं स्वीकारलं. जंगल आणि प्राणी सृष्टी चितमपल्लींना एखाद्या विविधांगी व्यवस्थेसारखं दिसतात. मग कधी ते प्राणी पक्ष्याच्या निवासाची वर्णने करतात. कधी त्यांच्या प्रजोत्पादनाची, कधी संवाद–संपर्काची वर्णने करतात. जगलाशी एकरूप झालेला जंगलाचा सोबती म्हणून ते चोहीकडे फिरतात आणि आख्यायिका गोळा करतात. मिथ्यकथांची वेगवेगळी रूपं गोळा करतात. नवे शब्द, नवे वाक्प्रचार आणि विषयाशी समरस झालेलं मन यातून चितमपल्लींचे भाषा एकदम रसरशीत होऊन जाते. यावरून असे वाटते की, चितमपल्लींचे लेखन हे माहितीकडून ज्ञानाकडे आणि ज्ञानाकडून सौंदर्याकडे जाणारे झाले आहे. निबंध वाचत असताना वाचकाच्या मनातील कुतूहल जागृत होते जिज्ञासा वाढते. वाचक उत्सुकतेने अधिरतेने पुढे काय लिहिलंय म्हणून वाचत जातो. एक आगळाच आनंद प्राप्त होतो एक उत्तम साहित्यकृती वाचल्याचे समाधान मिळते. काव्य प्रयोजनामध्ये विद्वानांनी आनंद हे सर्वात महत्वाचे प्रयोजन मानले आहे. चितमपल्लींचे साहित्य वाचताना वाचक तल्लीन होऊन जातो.

आनंदाचे डोही
आनंद तरंग।

हेच चितमपल्लीच्या लेखनाचे यश म्हणावे लागेल.

## संदर्भ सूची


१. गोरे दादा, प्रथमावृत्ती, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७ पृ. ६२.

२. चितमपल्ली मारुती, जंगलाचं देणं, सातवी आवृत्ती, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, 2002, पृ. प्रास्ताविक.

3. चितमपल्ली मारुती, शब्दाचं धन, तिसरी आवृत्ती, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २००५ पृ. ७

४. चितमपल्ली मारुती, रानवाटा, प्रथमावृत्ती, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर १९९१, पृ. प्रास्ताविक.

५. राजवाडे वि. का, (संपा.), श्री ज्ञानेश्वरी अध्याय सहावा, प्रथमावृत्ती, गर्व्हमेंट प्रकाशन, प्रेस, मुंबई, १९०१ पृ. १०९.

६. जाधव रा. ग., वाङ्मयीन निबंधलेखन स्वरूप आणि साधने, प्रथमावृत्ती, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६७, पृ. ९१

७. हातकणंगलेकर म. द, साहित्यविवेक, प्रथमावृत्ती, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७ पृ. १८3.

८. पुजारी सुहास, रानावनातला माणूस प्रथमावृत्ती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९९७, पृ. 33.

९. उनि, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, पृ. ६२.

१०. उनि, जंगलाचं देणं, पृ. १/२

११. उनि, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, पृ. ६२.

१२. तत्रैव, पृ. ६3.

१3. उनि, (संपा.) श्री ज्ञानेश्वरी, पृ. १०९.

१४. माडगूळकर व्यंकटेश, अशी माणसं अशी साहसं, द्वितीयावृत्ती, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, १९९०, पृ १७०.

१५. उनि, चितमपल्ली मारुती, पृ. मलपृष्ट.

१६. उनि, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, पृ. ६3

१७. तत्रैव पृ. ६3.

१८. तत्रैव पृ. ६3.

१९. मुलाखत, दिनांक ११/१२/२००६.

२०. उनि, अशी माणसं, अशी साहसं, पृ १६५.

२१. उनि, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, पृ. ६3

२२. उनि, रानावनातला माणूस, पृ. ३७/३८.

२३. आफळे ज्योत्स्ना, निपुणगे ह. ल., (संपा), महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक २९१/२९२ ऑक्टोंबर १९९९ ते मार्च २०००, पृ. १०.

२४. उनि, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, पृ. ६४

२५. उनि, रानावनातला माणूस, पृ. ३७.

२६. तत्रैव, पृ. ४७.

२७. तत्रैव, पृ. २७.

२८. देसाई रणजित, मोरपंखी सावल्या, प्रथमावृत्ती, मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे, १९८४. पृ.मलपृष्ठ.

२९. ~~उनि, साहित्य समीक्षा~~ आणि आस्वाद, पृ. ६४.

३०. तत्रैव, पृ. ७०.

३१. मुलाखत, दिनांक ११/१२/२००६.

३२. उनि, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, पृ. ७१.

३३. तत्रैव, पृ. ७१.

३४. चितमपल्ली मारुती, चकवा चांदणं:एक वनोपनिषद, प्रथमावृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई, २००५पृ.६४.

३५. उनि, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, पृ. ७१.

३६. उनि, रानावनातला माणूस, पृ. ४०.

३७. उनि, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, पृ. ६२.

३८. तत्रैव, पृ. ६५.

३९. तत्रैव, पृ. ६५.

४०. उनि, रानावनातला माणूस, पृ. ३४.

४१. तत्रैव, पृ. ४२.

४२. उनि, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, पृ. ६४.

४३. उनि, रानावनातला माणूस, पृ. मलपृष्ट.

४४. सोनकांबळे प्र. ई., आठवणींचे पक्षी, तृतीयावृत्ती, चेतना प्रकाशन, औरंगाबाद, १९८२ पृ. अभिप्राय.

४५. चितमपल्ली मारुती, सुवर्णगरूड, द्वितीयावृत्ती, नवचैतन्य प्रकाशन मुंबई, 2003 पृ. प्रस्तावना

४६. उनि, रानावनातला माणूस, पृ. ३९.

४७. उनि, जंगलाचं देणं, पृ. ४३

४८. उनि, चैत्रपालवी, पृ. ९०

४९. भागवत दुर्गा, निसर्गोत्सव, प्रथमावृत्ती, दिलीप प्रकाशन, मुंबई, १९९६, पृ. ४६.

५०. पाठक वा. भा, टीका आणि टीकाकार, द्वितीयावृत्ती, अनमोल प्रकाशन, पुणे, १९७२, पृ. २९८.

५१. आळतेकर म. मा, मराठी निबंध, प्रथमावृत्ती, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६३, पृ. ५९.

५२. लेले वामन केशव, ललित लेखन व शैली, प्रथमावृत्ती साहित्यप्रसार केंद्र, नागपूर, १९८४ पृ. ३०.

५३. तत्रैव, पृ. २८ / २९.

५४. मुलाखत, दिनांक ११/१२/२००६.

५५. उनि, जंगलाचं देणं, पृ. ५.

५६. वाळींबे रा. श., साहित्य मीमांसा, प्रथमावृत्ती, व्यवस्थापक चित्रशाळा प्रेस, पुणे, १९५५, पृ. ८७.

५७. जाधव रा. ग, पुढारी (बहार) रविवार दिनांक, पृ. ७१. २० नोहेंबर २००५.

५८. डॉ. खांडगे मंदा, पाटील तानाजी, मोहिते शिवाजीराव, (संपा.), ललित रंग पृ. प्रास्ताविक.

५९. उनि, रानावनातला माणूस पृ. २९.

६०. लेले वामन केशव, ललित लेखन व शैली, प्रथमावृत्ती, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, १९८४,पृ.३२.

६१. तत्रैव, पृ. ४९ / ५०.

६२. खांडेकर वि. स., हिरवळ, तिसरी आवृत्ती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २००१, पृ. मलपृष्ट.

६३ बर्दापूरकर प्रवीण, लोकमत वृत्त विशेष, दि. २८ जानेवार २००६.

६४. उनि, ललित लेखन व शैली, पृ. ५०.

६५. उनि, जंगलाचं देणं, पृ. मलपृष्ट.

६६. उनि, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, पृ. ७६.